म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा-वा
दा. क्र. ११७८९.

IRBK-0111769

ा. सं. वाचनालय, ठाणे
विषय
क्र. ११८६९



# तुम्हांस अमुचे लाख प्रणाम

डॉ. म. वि. गोखले
एम्. ए. पीएच्. डी.

# तुम्हांस अमुचे लाख प्रणाम !

( विविध प्रांतांतील वीरांच्या कथा )

3393
30/12/56

लेखक

डॉ. म. वि. गोखले,
एम्. ए. पीएच्. डी.

IRBK-0111769

: प्राप्तिस्थळ :

अरगडे आणि मंडळी, अप्पा बळवंत चौक, पुणे २.

प्रकाशक : अरगडे-कुलकर्णी प्रकाशन, पुणे १.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. हळदीघाटचा हिम्मतबहाद्दर ! | – राणा प्रताप | ५ |
| २. "खुणा सांगती अमरकथा !" | – अमरसिंह | २४ |
| ३. 'पावनखिंडीतला पुरुषार्थ' | – बाजीप्रभू देशपांडे | ३६ |
| ४. आसामचा अभिमान ! | – लाछित बड्फुकन | ४८ |
| ५. "पांचालंकुरिच्चीचा पाण्डिय" | – वीर कट्टबोम्मन | ५९ |
| ६. कित्तूरची राणी | – राणी चन्नम्मा | ७० |
| ७. 'मेरी झाँसी नहीं दूँगी' | – राणी लक्ष्मीबाई | ७९ |
| ८. 'ऐंशी वर्षांचा बिहारी तरुण' | – कुँवरसिंह | ८८ |

## १. हळदीघाटचा हिम्मतबहादूर !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.



राणा प्रताप

दिल्लीकडे निघालेली राजा मानसिंगाची फौज कुंभलगडापासून चार कोस दूर असलेल्या मुक्कामावर होती. सूर्योदयाचा समय जवळ येत चालला होता. पूर्वेकडील क्षितिजावर आरक्त सूर्यकिरणांचा प्रकाश उजळू लागला होता. अशा वेळी सारी छावणी गजबजून गेली होती. कूचाच्या इशारतीची वाट पाहात सारेजण सज्ज होऊन बसले होते; पण अजूनही राजा मानसिंगाने फौजेला कूचाचा हुकूम दिला नव्हता. तो अधीरतेने कोणाची तरी वाट पाहात होता हे त्याच्या हालचालीतून स्पष्टपणे सूचित होत होते.

एवढ्यात एक घोडेस्वार वेगाने छावणीच्या रोखाने दौडत आला. छावणीच्या जवळ आल्यावर त्याने घोड्याचा वेग कमी केला. राजा मानसिंगाच्या रोखाने एकवार पाहून त्याने आपला घोडा तिकडे वळवला. तो स्वार राजाच्या दिशेने जाऊ लागला, तेव्हा सैन्यातील सैनिकांच्या नजरा कुतुहलाने त्याच्यावर रोखलेल्या होत्या, त्यांच्या चेहऱ्यांवर उत्कंठा आणि आश्चर्य अशा संमिश्र भावना उमटल्या होत्या. तो स्वार जेव्हा राजा मानसिंगाच्या जागेपासून काही अंतरावर पोहोचला तेव्हा त्याने आपला घोडा थांबवून खाली उडी घेतली आणि पायी चालत जाऊन राजाला मुजरा केला.

" बोलो – क्या हुवा ? " मानसिंगाने प्रश्न केला.

" आपल्या निरोपामुळे फार आनंद झाला त्यांना. ' आपण अवश्य यावे ' असा त्यांनी उलट निरोपही पाठविला आहे आपल्याला. "

" अच्छा – ! " राजा मानसिंग खूष होऊन आपल्या कमरबंदावर हात ठेवीत म्हणाला.

" शिवाय मी तेथे असतानाच त्यांनी आपल्या कारभाऱ्यांना हुकूम दिला की, आपल्यासाठी स्वागताचा आणि मेजवानीचा खास बंदोबस्त झाला पाहिजे. " तो स्वार पुढे म्हणाला.

" ठीक, ठीक. कूचाची इशारत द्या. कुंभलगडावरच आपला पुढचा मुक्काम होईल. " राजा मानसिंगाने सूचना दिली व तो तेथून निघून गेला.

*  *  *

दिल्लीचा बादशाहा अकबर याच्या दरबारात अंबरचा राजा मानसिंग याचा फार मोठा अधिकार होता. एक तर तो शूर लढवय्या असून

अकबराची कीर्ती वाढविण्यास आणि राज्यविस्ताराची लालसा पूर्ण करण्यात त्याची फार मोठी मदत झाली होती. दुसरे असे की, मानसिंगाने आपल्या बहिणीचा विवाह अकबराशी करून त्याच्याशी सोयरीकही जोडली होती. या दोन्ही कारणांमुळे राजा मानसिंग अकबराच्या दरबारातले एक बडे प्रस्थ होऊन बसला होता. आपल्या दिल्लीच्या दरबारातील वर्चस्वाचा मानसिंगाला फार अभिमान वाटत असे. सर्वांनी आपल्याला त्याच तोलाने वागवावे आणि आपल्याशी वागताना तीच आदब दाखवावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. दिल्लीच्या सत्तेला भिऊन वागणारे तसे करीतही; पण यालाही एक अपवाद होताच—

स्वदेश, स्वधर्म आणि स्वत्व यांचा अभिमान बाळगणारा राणा प्रताप, राजा मानसिंगासारख्यांची किंमत करीत नव्हता. राणा प्रताप मेवाडच्या पराक्रमी राजघराण्यात जन्मला होता. बाप्पा रावळ, पृथ्वीराज, राणा संग आणि राणा उदयसिंग या प्रतापशाली पूर्वजांचा वारसा चालविणारा राणा प्रताप स्वातंत्र्याचे बाळकडू प्यायला होता.

राणा प्रतापाचा पिता उदयसिंग लहान असतानाच गादीवर बसला. मेवाड प्रांतातील चितोडच्या राजवंशातला हा मुलगा लहान असताना त्याच्यावर प्राणसंकट आले होते; परंतु त्या वेळी त्याचा सांभाळ करणाऱ्या पन्नादाईच्या स्वामिभक्तीने व धाडसी युक्तीने त्याचे प्राण वाचले. या प्रसंगात तिने आपल्या पोटच्या पुत्राला बळी दिले. पुढे काही वर्षे अज्ञातवासात काढल्यावर उदयसिंगाची ओळख पटून अनेक स्वामिभक्त आणि चितोडच्या राजवंशाचे अभिमानी सरदार त्याला येऊन मिळाले. पन्नादाईच्या साक्षीने त्यांची खात्री पटली होतीच. या सर्व राजपूत सरदारांनी मग उदयसिंगाला राजा मानला व चितोडवर स्वारी करून उदयसिंगाची गादीवर स्थापना केली.

उदयसिंग गादीवर आला त्या वेळी दिल्लीच्या सिंहासनावर अकबर हा पराक्रमी बादशाहा होता. त्याची महत्त्वाकांक्षा जबर होती. त्याने चितोडवर स्वारी करून चितोड जिंकून घेतले. उदयसिंग तेथून पळाला आणि अरवली पर्वतात जाऊन राहिला. तेथेच त्याने आपली छोटी राजधानी निर्माण केली. अरवली पर्वताच्या कुशीत वसलेले उदेपूर किंवा उदयपूर हीच ती उदयसिंगाची राजधानी.

उदयसिंगाने सोनीगडच्या ठाकूरकन्येशी विवाह केला होता. तिच्या पोटी राणा प्रतापाचा जन्म झाला. उदयसिंगाचा हा ज्येष्ठ पुत्र. याचे सारे बालपण कुंभलगडावर गेले. लहानपणापासूनच त्याला मर्दानी खेळांची आवड होती. तो आणि त्याचा भाऊ सूक्त असे दोघेजण त्या काळी राजपुत्रास आवश्यक असे शिक्षण घेत होते. तलवारींची द्वंद्वे, भालाफेक, धनुष्यबाणांचा वापर, घोड्यावरची रपेट यांत हळूहळू ते तरबेज झाले. लुटुपुटीच्या लढाया करण्याचा प्रतापाचा छंद वाढीस लागला. त्याचबरोबर दरबारी भाटांकडून शूर पूर्वजांचा इतिहास, पराक्रमी पुरुषांची चरित्रे, देशभक्तांच्या कथा आणि शीलवती राजपूत स्त्रियांची उदात्त वर्णने त्यांना ऐकावयास मिळाली. त्याचाही परिणाम त्यांच्या मनावर होत होताच. प्रतापाच्या वीरश्रीयुक्त मनोभूमिकेची मशागत अशा प्रकारे झाल्यामुळे क्षात्रतेज, चारित्र्य, ध्येयनिष्ठा आणि आत्मविश्वास या सर्वच बाबतीत त्याचे मन सुफलित झाले.

* * *

राणा उदयसिंग इ. स. १५७२ मध्ये मरण पावला. प्रताप हा जरी त्याचा ज्येष्ठ पुत्र होता तरी आपल्यामागे जगमलदेवास म्हणजे सर्वांत लहान पण आवडत्या राणीच्या मुलाला गादीवर बसवावे अशी इच्छा उदयसिंगाने मरताना व्यक्त केली होती. उदयसिंगाच्या मृत्यूनंतर

जगमलाच्या राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली. त्या वेळी प्रताप हा खिन्न मनाने राज्याबाहेर जाण्याची तयारी करीत होता. त्याच वेळी सोनीगडच्या ठाकुराच्या पुढाकाराने चितोड-दरबारचे अनेक सरदार एकत्र आले. त्यांनी प्रतापाचे मन वळवून त्यास जेथे जगमलास राज्याभिषेक होणार होता तेथे नेऊन त्याच्या शिरावर मुगुट ठेवला आणि राज्याचा स्वामी म्हणून त्याला मुजरे केले. राणा प्रताप मेवाडाधिपती झाला. राणा प्रतापाच्या महत्त्वाकांक्षी मनाला नवे क्षितिज प्राप्त झाले.

राणा प्रतापला आता मेवाडचे राज्य प्राप्त झाले होते; पण उदयसिंगाच्या वेळी दिल्लीपतीने जिंकून घेतलेली चितोडची राजधानी अजून त्याच्याच ताब्यात होती, हे शल्य प्रतापाच्या मनात डाचत होते. चितोड परत जिंकून घेण्याची त्याची इच्छा होती. पण यासाठी पैसा, परिस्थिती आणि पराक्रमी अनुयायांची आवश्यकता होती. त्या दृष्टीने सर्व तयारी करणे ही प्रमुख गरज होती; परंतु असा प्रयत्न सुरू केल्यावर प्रतापाला अत्यंत वाईट अनुभव आला. दिल्लीच्या बादशाहाशी वैर करण्यासारखी हिंम्मत राजपूत राजांत उरलेली नव्हती. काहींनी अकबरबादशाहाशी सोयरीक केली होती, कित्येकांनी त्याचे मांडलिकत्व पत्करले होते; बहुतेकांचा आपल्या पराक्रमावरचा विश्वास उडाला असून ते भ्याड बनले होते. प्रतापाच्या महत्त्वाकांक्षी, स्वाभिमानी आणि पराक्रमी बेताला यामुळे त्यांचे साहाय्य तर मिळाले नाहीच; पण उलट सर्वत्र फितुरीचा अनुभव मात्र येत गेला. प्रतापाला अत्यंत दुःख झाले. शरीराने व मनाने बाटलेल्या या राजपूत म्हणविणाऱ्या देशबांधवांचा त्याला खूप राग आला. अखेरीस या अशा बाटग्यांवर बहिष्कार घालण्याचे प्रतापाने ठरविले. काही देशाभिमानी व राजपुतांच्या रक्ताचे अभिमानी स्वतंत्र वृत्तीचे वीर या बहिष्कारात सामील झाले. राष्ट्राभिमान जागृत होत गेला तसातसा प्रतापाचा पक्ष बळ धरू लागला.

राजा मानसिंगाची म्हणजेच एका स्वाभिमान विकलेल्या राजपुताची राणा प्रतापाला किंमत वाटत नव्हती. मानसिंग एक राजपूत म्हणून प्रतापाला जेवढा जवळचा, तेवढाच त्याने दिल्लीच्या बादशाहाशी सोयरीक केल्याने अत्यंत दूरचा ठरला होता. राजपुतान्यातून दिल्लीला जाताना वाटेत राजा मानसिंगाने जेव्हा कुंभलगडावर प्रतापाची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा प्रतापाने एक राजपूत राजा म्हणूनच त्याच्या भेटीला संमती दर्शविली. आतिथ्यात कोणतीही कमतरता न राहू देण्याची आज्ञा त्याने आपल्या कारभाऱ्यांना दिली. त्याचबरोबर त्याने आपल्या मुलाला जातीने मानसिंगासाठी मेजवानीची खास व्यवस्थाही करण्यास सांगितले. राजा मानसिंगाच्या दूताबरोबर तसा संदेश पाठवला. राजा मानसिंगाच्या स्वागतासाठी तो स्वतः वेशीबाहेर हजर राहिला. मोठ्या इतमामाने त्याने मानसिंगाचे स्वागत केले. त्याला सुंदर असा महाल राहण्यासाठी दिला होता तेथवर पोहोचवून प्रताप आपल्या राजवाड्यात परतला.

राजा मानसिंगाने आपल्या स्वागताचा अर्थ लावला तो असा की, आपल्या पराक्रमाने आणि दिल्लीच्या दरबारातील आपल्या हुद्द्याने राणा प्रताप मनातून घाबरला असावा. या विचाराने राजा मानसिंगाला गर्व चढला. त्याच्या मनात निर्माण झालेल्या या गर्वामुळे तो राणा प्रतापाला चार उपदेशाच्या गोष्टी सांगण्याची कल्पना लढवू लागला. या कल्पनासृष्टीत तो दंग असतानाच भोजनाची सिद्धता असल्याचा निरोप आला.

“ राजाजी, भोजनाची सिद्धता झाली आहे. ” वर्दी आली.

“ हां हां, ठीक आहे. आम्ही निघतोच आहो म्हणून सांगा राणाजींना. ” राजा मानसिंग कुर्ऱ्यात म्हणाला. आजच्या एकत्र जेवण करण्याच्या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावयाचा मनाशी निश्चय करीतच

मानसिंग निघाला. मेजवानीचा बंदोबस्त एका आलीशान महालात केलेला होता. राजा मानसिंगाला मोठ्या अदबीने तिकडे नेण्यात आले. ती आदब, ती आपुलकी, तो थाटमाट पाहून मानसिंगाच्या मनात आपल्या मानमरातबाची धुंदी वाढत होती. भोजनाच्या पंक्तीत त्याचे स्थान त्याला दाखविण्यात आले. सर्व मानकरीही आपापल्या जागी जाऊन बसले; पण — मानसिंगाची नजर काही तरी शोधीत होती.

राणा प्रताप तेथे दिसला नाही. त्याच्यासाठी एखादे पानही राखून ठेवलेले नव्हते. राजा मानसिंगाच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला.

" आरंभ करावा महाराज — "

" पण राणाजी अजून यायचे आहेत ना ? " या प्रश्नाबरोबरच मानसिंगाने शोधक नजरेने सर्वत्र पाहिले. राणा प्रतापाचे कारभारी निःशब्द होते. मानसिंगाने या निःशब्दतेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला — त्याने यावर

" राणाजी येणार आहेत ना ? " सरळच प्रश्न विचारला.

" नाही. राणाजींची प्रकृती ठीक नाही. ते येणार नाहीत." उत्तर मिळाले.

मानसिंग ताडकन् उठून उभा राहिला. त्याच्यासारख्या नित्य राजकारणात रंगलेल्या राजाला याचा अर्थ समजायला वेळ लागला नाही.

" समजलो. राणाजींच्या प्रकृतीचे स्वास्थ्य कशामुळे बिघडले आहे ते आम्ही जाणून आहो. पण आम्ही इथे येण्यासंबंधी निरोप पाठवला त्या वेळीच या गोष्टीचा विचार करायला हवा होता. आपणहून बोलावून आणल्यानंतर अशा तऱ्हेनं एका पाहुण्याला दुखावणं बरोबर नाही. आम्ही हा आमचा अपमान समजतो असा राणाजींना निरोप कळवा. आमच्या महालात आम्ही त्यांची वाट पहातो आहो. " एवढे बोलून

आपल्या सहकाऱ्यांना इशारा देऊन राजा मानसिंग रागाने तेथून निघून गेला.

राणा प्रतापाने हा सारा बनाव ज्यासाठी घडवून आणला होता ती त्याची इच्छा पूर्ण झाली होती. त्याने जाहीर केलेल्या व पुरस्कारिलेल्या बहिष्काराच्या धोरणाला धरूनच त्याचे वर्तन होते. जेव्हा राजा मानसिंगाचा निरोप प्रतापाला मिळाला, तेव्हा ताबडतोब तो त्याच्या भेटीसाठी गेला.

" प्रणाम राजाजी ! आपण अन्नाचा अव्हेर करून निघून आलात असं समजलं म्हणून मी जातीनं आलो आहे आपल्याला भोजनाचं निमंत्रण द्यायला. " राणा प्रतापाने मानसिंगाशी बोलणे सुरू केले.

" अस्सं ! " राजा मानसिंग त्यावर चिडून म्हणाला, " राणाजी, आपण आमच्याबरोबर जेवायला नव्हतात, — येणार आहात का आपण ? "

" नाही. ते शक्य नाही ! कारण — " प्रतापाला पुढे बोलू न देता मानसिंग म्हणाला —

" राणाजी ! नसती कारणं पुढं करून मूळ हेतू डावलण्याचा आपला कावा आम्ही जाणतो. ही आमची बेअदबी आम्ही — "

" राजाजी, आपण रागावण्याचं कारण नाही. आपल्याला जशी आपली तशी आम्हाला आमची नीती प्यार आहे. आपण एक राजपूत राजे आहात आणि इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा राजपूत आपल्या स्वाभिमानाला जिवापाड जपतो हे आम्ही आपल्याला सांगावं असं नाही." प्रताप अजून शांतपणाने बोलत होता.

प्रतापाच्या या शांत बोलण्यामुळेच मानसिंग अधिकाधिक चिडत होता. त्याचा संयम सुटत चालला होता.

" एवढं स्वाभिमानाचं महत्त्व आपल्याला समजत असेल तर आमच्या स्वाभिमानाची कदर आपणही करायला हवी होती. "

" आपण आपला स्वाभिमान – अस्सल राजपुताला शोभणारा स्वाभिमान – केव्हाच विकला आहे. " प्रतापाने निक्षून सांगितले.

" प्रताप ! " मानसिंगाच्या तोंडून रागाने उद्गार बाहेर पडला.

" हां हां राजाजी, आपण क्रोधाच्या आहारी जात आहात; पण मी आपल्याला निक्षून सांगतो की कोणाही राजपुतानं शरीर आणि मन दुसऱ्याला विकलं असेल तर राणा प्रताप देहात प्राण असेपर्यंत त्याच्याबरोबर जेवणं शक्य नाही ! "

" मग याचा विचार आमची भेट घेण्यापूर्वी आपण करायला पाहिजे होतात. आम्हाला स्वतःच्या घरी बोलावून आमचा असा अपमान करणं हे राजपुताला शोभणारं वर्तन खास नाही ! " मानसिंग म्हणाला.

" आम्ही आपली भेट घेतली ती देशबंधूच्या नात्यानं ! आपले आणि आमचे पूर्वीपासूनचे संबंध लक्षात घेऊन ! आपल्या स्वागताची सिद्धता केली ती पूर्वायुष्यातले अंबराधिपती म्हणून ! त्याचा पंक्तीत जेवण्या न जेवण्याशी काय संबंध ?– "

" आहे निश्चित संबंध आहे. पाहुणचाराची ही रीत नव्हे. जर आपण पूर्वसंबंध जाणता तर त्यात बदल व्हायचं कारण नव्हतं– "

" होतं. निश्चित कारण होतं. आता आपण एका परक्या धर्माच्या, रक्ताच्या, माणसाशी सोयरीक जोडली आहे. आपला वंश आता अस्सल राजपुताचा उरलेला नाही. आपण पूर्वी अंबराधिपती म्हणून आम्हाला वंद्य होतात. आता आपलं राजेपण, आपलं स्वातंत्र्य दुसऱ्यांच्या पदरांत पडलेलं आहे. त्यांच्या कृपेवर, भिक्षेवर आजचा आपला हुद्दा अवलंबून

आहे. म्हणून – म्हणून राजाजी, राणा प्रतापासारखा स्वतंत्र आणि स्वाभिमानी राजपूत आपल्या पंक्तीला जेवणार नाही ! ” प्रतापाने राजा मानसिंगापुढे आपली बाजू जोरदारपणे मांडली.

“ बस्स. बस्स. बहोत हुवा. स्वातंत्र्य आणि स्वाभिमानाच्या गप्पा मारून आपल्या बेमुर्वत वागण्याचं समर्थन करू नकोस ! प्रताप ! लक्षात ठेव. मानसिंगाचा मानभंग करून तू संकट ओढवून घेतलं आहेस. स्वतःच्या घरात तू हे भ्याड कृत्य केलस; पण रणांगणावर या भ्याड-पणाचा जाब तुला द्यावा लागेल. तुझ्या अभिमानासकट तुला नेस्तनाबूत व्हावं लागेल ही राजा मानसिंगाची प्रतिज्ञा आहे ! ”

“ राजाजी, आपण एका राजपुताला रणांगणाचं भय दाखवता ? यातच आपल्या बाटग्या विचाराची झलक दिसली मला. आपण केलेल्या प्रतिज्ञेला प्रतिसाद देण्यासाठी आता आपण रणांगणावर भेटू अस मीही आपल्याला आव्हान देतो ! ” प्रतापाने बाणेदारपणे म्हटले.

– राजा मानसिंग प्रतापाच्या सूडाची भावना मनात घेऊन दिल्लीकडे निघाला.

– राजा मानसिंगाला आपण स्वाभिमानी राजपुताचे दर्शन घडविले या आनंदात राणा प्रताप आपल्या ठिकाणी खूष झाला.

* * *

कुंभलगडाहून निघून दिल्लीला पोहोचण्याच्या वाटेवरील अंतर जसजसे कमी होत गेले तसतसा राजा मानसिंगाचा प्रतापावरील राग वाढत गेला. राणा प्रतापाची सर्व हकीगत बादशाहाच्या कानावर घालून त्याचाही क्रोध जागा करण्यासाठी त्या हकीगतीला प्रत्यक्ष आणि ऐकीव अशा बातम्यांची जोड कशी द्यावी याचा विचार करीतच त्याने प्रवास संपविला. राजा मानसिंग दिल्लीस जाऊन पोहोचला.

इकडे कुंभलगडावर सर्व कारभाऱ्यांची बैठक भरवून राणा प्रतापाने त्यांना घडलेली हकीगत निवेदन केली. राजा मानसिंगाचा आपण अपमान केला याचा आनंद मानून त्या भावनेत गुंतून न राहता पुढे निर्माण होणाऱ्या संकटाचा विचार करणे कसे आवश्यक आहे, हे त्याने सर्वांस समजाविले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्वांना हुशारीने व दक्षतेने राहण्यास सुचवून राणा प्रताप पुढे म्हणाला, –

" यानंतर लवकरच आपण एका मोठ्या युद्धात ओढले जाणार आहोत हे खास. तेव्हा प्रत्येकाने त्यागाची, बलिदानाची सिद्धता केली पाहिजे. घडल्या प्रसंगातून वैर उभे राहणार आहे ते मानसिंगाबरोबर नाही तर प्रत्यक्ष दिल्लीच्या बादशाहाशी ! तेव्हा वीरहो, पुढील युद्ध म्हणजे शेजाऱ्याशी झालेली छोटी लढाई नसणार. हे युद्ध म्हणजे आपल्या राजपूतांच्या प्रिय मातृभूच्या स्वातंत्र्यासाठी लढलं गेलेलं युद्ध ठरणार ! ह्या युद्धाच्या निर्णयावर आपल्या स्वातंत्र्याची, स्वाभिमानाची आणि स्वीकृत कार्यावरील निष्ठेची परीक्षा अवलंबून राहणार आहे. तेव्हा आतापासूनच तयारीला लागलं पाहिजे. " यानंतर प्रतापासह सर्वांनी श्रीएकलिंगजी या दैवताच्या साक्षीने प्राण जाईतो ध्येयनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. प्रतापाने यानंतर निरनिराळ्या सरदारांकडे दूत पाठवून त्यांच्या मदतीची आश्वासने मिळविली. अनेक तऱ्हांनी पैसा उभा करण्याचा प्रयत्न सुरू केला. राजपुतान्यातील विशेषतः अरवली पर्वतातील भिल्लांचे सैन्य तयार करण्यासाठी त्यांना लढाईला आवश्यक असे शिक्षण देण्याची व्यवस्था केली. अशा प्रकारे हळूहळू प्रतापाची युद्धविषयक सिद्धता होत गेली.

* * *

दिल्लीला पोहोचल्यानंतर मानसिंग अकबराला भेटण्यासाठी गेला.

बरेच दिवसांनी ही भेट होत होती, शिवाय राजपुतान्यातील परिस्थिती मानसिंगाकडून प्रत्यक्ष समजणार होती म्हणून बादशाहाही त्याची भेट घेण्यास उत्सुक होता.

" आइये राजाजी, तशरीफ रखिये. " अकबराने आपल्या मिठ्ठास वाणीने मानसिंगाचे स्वागत केले. " कहिये आपली सफर कशी झाली ? रस्त्यात काही तकलीफ तर झाली नाही ना – ? "

" आपकी दुवासे सफर ठीक हुअी जहापन्हा ! लेकिन – " मानसिंग नम्रपणे म्हणाला. पण त्याच्या स्वरातली व्यथा चाणाक्ष अकबराने ओळखली.

" लेकिन क्या ? आपण रंजीस का आहात राजाजी ? " अकबराने विचारले.

" राजपुतान्यात एका नव्या शत्रूचा उदय होतो आहे. अत्यंत विषारी आहे हा सर्प. वेळीच ठेचला गेला नाही तर परिणाम भयंकर होतील. "

मानसिंगाने आपल्या मनातली प्रतापाच्या सूडाची भावना अकबरापर्यंत नेऊन पोहोचविली. अकबरालाही या वार्तेने आणि प्रत्यक्ष मानसिंगाकडून ती ऐकायला लागल्याने मोठीच चिंता वाटली.

" सच ! कौन है वह जहरी सर्प ? " अकबराने प्रश्न केला.

" राणा प्रताप ! " मानसिंगाने उत्तर दिले.

" राणा प्रताप ! " अकबराने विचार केल्यावर त्याला आठवले, " ओह, चितोडपर कबजा करनेका ख्वाब देखनेवाला प्रताप ? "

" होय, तोच प्रताप. " मानसिंग घाईने म्हणाला.

" पण तो अरवली पर्वतात पळून गेलेल्या चितोडच्या उदयसिंगाचा

बच्चा इतका धोकेबाज वाटतो आपल्याला राजाजी ! कमाल की बात है ! ”

“ आता तो बच्चाही नाही आणि उदयसिंगाच्या तोलानं त्याला जोखणं ठीक नाही जहापन्हा ! तो शूर आहे. राजपूतांच्या मनात स्वदेश आणि स्वधर्म यांचा अभिमान जागा करून त्यानं आपला पक्ष प्रबळ करायचा उद्योग केव्हाच सुरू केलाय. हा सारा उद्योग चितोड पुन्हा जिंकून घेण्याच्या ईर्षेने चालू आहे याचा आम्ही प्रत्यक्ष अनुभव – ” मानसिंग सांगू लागला.

“ खुद आपको अनुभव ? राजाजी, इसका मतलब ? ” अकबराचं कुतूहल वाढत गेले.

अकबराला प्रतापाच्या उद्योगाची आणि स्वतः मानसिंगाशी त्याने केलेल्या वर्तनाची साद्यंत हकीगत राजा मानसिंगाने अशी काही खुलवून सांगितली की अकबराला आपला राग आवरणे अशक्य झाले –

“ नही नही राजाजी ! हा मानसिंगाचा नाही तर खुद्द बादशाहाचाच अपमान आहे. अगर प्रतापाची आणि त्याच्या साथीदारांची एवढी हिम्मत असेल तर बाकायदा त्यांना धडा शिकवलाच पाहिजे. फौरन आपण जातीनं ही मोहीम हाती घ्या राजाजी. बादशाही सल्तनतीशी बगावत मांडली तर त्याचा नतीजा काय होतो हे त्यांना कळलच पाहिजे. यही हमारा हुक्म है. देर न करता मोहिमेचा इन्तजाम झाला पाहिजे ! ”

मानसिंगाचा अपमान तो आपलाच अपमान मानून अकबराने राणा प्रतापाविरुद्ध मोहीम सुरू करण्याची आज्ञा दिली. मानसिंगाच्या मनातल्या सूडाला अशा रीतीने प्रत्यक्ष कृतीचे महत्त्व आले. शिवाय या मोहिमेचे

नेतृत्व राजा मानसिंगाकडेच आल्याने तो आनंदाने बेहोष झाला. राजा मानसिंगाचा मानभंग किती महाग पडतो ते प्रतापाला एकदा दाखवूनच देऊ अशा भावनेने तो जातीने फौजेचा बंदोबस्त पाहू लागला. अकबराने राजा मानसिंगाच्या मानभंगाचे निमित्त साधून प्रतापाच्या पराभवाची योजना निश्चित केली आणि मानसिंगाला मोहिमेचा प्रमुख नेमले; पण त्याच्या धूर्त दृष्टीला एक राजपूत दुसऱ्या राजपूताशी युद्ध करणार आहे यातील मर्म तेव्हाच उमगले आणि त्याने आपला पुत्र शाहजादा सेलीम यालाही मानसिंगाबरोबर युद्धासाठी पाठविण्याचा निश्चय केला.

प्रचंड सैन्य, भरपूर रणसाहित्य, शूर सरदार आणि प्रत्यक्ष शाहजादा सेलीम एवढ्या मोठ्या इतमामाची मोगलांची फौज बरोबर घेऊन राजा मानसिंग प्रतापावर चालून जाण्यासाठी दिल्लीहून रवाना झाला –

या बातम्या अर्थातच राणा प्रतापाच्या कानावर होत्याच. त्याने आपल्या वीस हजार प्रामाणिक सैनिकांवर आणि अरवलीच्या डोंगराळ प्रदेशावर भिस्त ठेवून मोगलांशी सामना करण्याची तयारी पूर्ण करीत आणलीच होती. उत्तर आणि पश्चिम यांच्यामधील भागांत किरकोळ प्रतिकार झाला तो मोडून मोगलांची फौज पश्चिमेकडून आत घुसली. राणा प्रताप अजूनही त्यांना खऱ्या अर्थाने आडवा झाला नव्हता. कारण अरवलीच्या अरुंद रांगांतून मोगली फौजा आणखी थोड्या पुढे येण्याची तो वाट पाहत होता –

उदेपूरच्या परिसरात पोहोचण्यासाठी आता या बादशाही सेनासागराला अरुंद अशा वाटेतून मार्ग काढावा लागणार होता. या प्रकारच्या प्रवासाने या सेनेला आधीच गुदमरल्यासारखे होणार होते. तरीही सेलीमच्या नेतृत्वाखालील ही प्रचंड फौज मानसिंगाच्या सल्ल्यानुसार आगेकूच करीत होती. लवकरच त्यांनी हळदीघाट गाठला. मुख्य

पर्वताच्या गळ्याशी भिडलेला हा भाग दरी आणि उंचवटा यामध्ये पसरलेला होता. या ठिकाणीच प्रतापाचे शूर राजपूत आधीच दबा धरून बसलेले होते. डोंगराच्या निमुळत्या कडयांवर आणि डोंगर सोडून बाहेर डोकावणाऱ्या सुळक्यांवर प्रतापाने आपल्या सैन्यातील भिल्ल लोक तिरकामठे आणि दगडांच्या राशी घेऊन बसविले होते. स्वतः प्रताप जातीने घाटाच्या तोंडावर उभा होता.

सेलीमने या घाटातून पार होण्यासाठी बिनीचे स्वार पाठविले; पण अर्ध्या रस्त्यातच दगड, बाण आणि गनिमी हल्ल्यांनी ते गारद झाले. यानंतर सेलीमला हळदीघाटातून पार होण्यासाठी तुकडयांमागून तुकडया पाठवाव्या लागल्या; पण प्रतापाच्या फौजेने त्यांना घाटरस्ता पाहूसुद्धा दिला नाही. सेलीम विचार करू लागला —

राणा प्रताप आपल्या इमानी व शूर सैनिकांना सारखे प्रोत्साहन देत इकडून तिकडे वाऱ्यासारखा फिरत होता; पण त्याचे सारे लक्ष होते राजा मानसिंग कोठे दृष्टीस पडतो का हे पाहण्यात; पण मानसिंगाचा शोध लागेना. अखेरीस त्याच्या मनातली मानसिंगाबद्दलची बेचैनी वाढत गेली आणि तो हळूहळू मोगल सैन्याकडे सरकू लागला. अजूनही राजा मानसिंग त्याच्या दृष्टीच्या टप्प्यात येत नव्हता —

मानसिंग प्रतापाला सहजासहजी दिसणार कोठून ? कारण तो केव्हाच लांबवर गेला होता. अगदी सेलीमच्या पथकाच्याही पलीकडे ! लढाई टाकून तो सुरक्षित जागी पोहोचला होता.

राणा प्रतापाला पुढे येताना अनेक वेळा निकराचा प्रतिकार झाला; पण प्रतिकार मोडून काढून तो पुढे सरकतच होता. अशा वेळी कराव्या लागलेल्या छोटया-मोठया झगडयांत राणा प्रतापाने शेकडो शत्रु-सैनिकांची शिरे धडावेगळी केली. तीन प्रसंगी तर तो मोगली

सैन्याकडून पूर्णपणे वेढलाही गेला होता; पण प्रत्येक वेळी पराक्रमाची शर्थ करून तो त्या वेढ्यातून बाहेर पडला. अशा रीतीने युद्धातील यश आपल्या बाजूला खेचीत प्रताप पुढेपुढे जात होता. त्याच्या-बरोबरच्या सैनिकांना त्याचा पराक्रम पाहून स्फुरण चढले. त्यांनीही आपल्या शौर्याची आणि युद्धकौशल्याची कमाल केली. मात्र जसजसे प्रताप व त्याचे सैनिक पुढे जात होते तसतसा मोगलांचा प्रतिकार वाढत गेला. प्रतापाच्या अंगावर यावेळी एकूण सात जखमा झाल्या होत्या. तो आता शाहजादा सेलीमजवळ आला होता. पराक्रमाच्या धुंदीत प्रतापाने आपला घोडा सेलीमच्या दिशेने फेकला. पाठोपाठ राजपूत सैन्य होतेच—

शाहजादा सेलीम एका मजबूत हत्तीवर बसून रणांगणावर वावरत होता. बेभानपणे मोगल सैन्य कापीत मोठ्या शिताफीने प्रताप सेलीमच्या हत्तीजवळ येऊन पोहोचला. काय होते आहे याची सेलीमला कल्पना येण्यापूर्वीच हत्तीचा माहूत आणि रक्षक प्रतापाच्या हल्ल्याला बळी पडले. निमिषार्धात परिस्थितीचा अंदाज घेऊन प्रतापाने ‘ चेतक ’ असा आपल्या निळ्या घोड्याला इशारा देऊन लगाम खेचला. तो इमानी घोडा जणू मालकाचे मन समजला. त्याने आपले पुढचे दोन्ही पाय उंचावून हत्तीच्या अंगावर रोवले. प्रतापाने क्षणही वाया न घालवता आपला भाला सेलीमच्या दिशेने फेकला. पण – पण हत्तीवरील हौद्याच्या पोलादी पत्र्यावर तो वार फुकट गेला – सेलीम वाचला. तेवढ्यात सेलीमच्या रक्षकांनी प्रतापाला पुरते वेढले. आता मात्र प्रतापाच्या नशिबाची परीक्षा होती.

सेलीम बचावला. त्याचा हत्ती अनेक जखमांनी जर्जर होऊन बेफाम झाला होता. तोंडाने चीत्कार करीत तो हत्ती सैरावैरा पळू लागला.

सेलीमला घेऊन हत्ती दूर गेला. राणा प्रताप आता सभोवार पसरलेल्या मोगल सैन्याच्या मध्यभागी सापडला होता. सर्व मोगल सैन्य चिडून प्रतापावर चालून आले. आपला राणा शत्रूच्या तावडीत सापडलेला पाहून राजपूत सैनिक आणि भिल्लांची सेना त्याच्या सुटकेसाठी धावून आली –

या वेळी तुंबळ रणकंदन झाले. ‘ दीन-दीन ’ आणि ‘अल्ला हो अकबर’ अशा रणगर्जना करीत प्रतापावर तुटून पडलेल्या मोगल सैन्याला, ‘ जय एकलिंगजी ’ या रणगर्जनेने स्फुरण घेऊन, प्रतिकार करणाऱ्या राजपूतांनी पराक्रमाची शर्थ चालविली. राणा प्रताप वीराला शोभणाऱ्या ईर्ष्येने लढत होता. अनेक जखमा अंगावर घेऊन तो शिकस्तीने झुंजत होता; पण तो थकला होता. तेवढ्यात त्याच्या विश्वासू घोड्याच्या – चेतकाच्या – पायाला वार लागला. राणा प्रतापाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. शत्रूची फळी फोडून बाहेर पडण्याचा त्याने नेटाचा प्रयत्न केला. त्याला यशही मिळाले. प्रताप शत्रुसैन्याच्या वेढ्यातून निघाला. पण शत्रूने त्याचा पाठलाग सोडला नाही.

अनेक राजपूतांनी या हळदीघाटच्या रणसंग्रामात धारातीर्थी देह ठेवले. ही वीरगती प्राप्त झालेल्या राजपूत वीरांची संख्या सुमारे चौदा हजार होती. आपल्या अनेक सहकाऱ्यांची ही रणसेवा पाहिल्यानंतर प्रतापाला कल्पनातीत दुःख झाले; पण शत्रू सारखा पाठीवर असल्याने वेगाने दूर जाण्याखेरीज दुसरा विचार करायला या वेळी सवडच नव्हती.

या प्रसंगी खरी कमाल केली चेतकाने ! आपल्या धन्यावरील प्राणसंकटाची जणू त्या मुक्या जनावराला जाणीव झाली होती. धन्याचे प्राण वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे हे ओळखून चेतक दौडत होता. कित्येक तास ही दौड चालू होती. वेगाची तर कल्पनाच

करवत नाही. पळता पळता वाटेत एक दुथडी वाहणारा रुंद ओढा आला. प्रतापाने हे पाहून क्षणभर विचार केला; पण – पण – छेः ! विचार करीत वेळ घालवायला चेतक तयार नव्हता. त्याने एकदम उसळी घेऊन जी उडी मारली – ती ओढ्याच्या पलीकडे ! ‘ शाबास ’! प्रतापाच्या तोंडून आनंदोद्गार बाहेर पडला—

त्या उत्तेजनपर शाबासकीच्या धुंदीत चेतकाने पूर्वीच्याच वेगाने आणि जिद्दीने धावून अनेक अडथळे आणि ओढेनाले ओलांडले. मोगल सैन्याच्या तावडीतून राणा प्रतापाला दूर नेण्याचे चेतकाचे कार्य यशस्वीपणे पार पडले. हळदीघाटचा हिम्मतबहाद्दर हे आपल्या धन्याचे बिरुद कायम ठेवण्यासाठी प्राणपणाने धावलेला चेतक आता अगदी थकला होता – तरीही अजून तो धावतच होता.

एके ठिकाणी प्रतापाला कोणाची तरी हाक ऐकू आली. “थांब, थांब ! प्रतापा थांब. ” प्रतापाने हळूहळू चेतकाला वेग कमी करायला लावला. प्रतापाचा प्रत्यक्ष भाऊच त्याला हाक मारीत होता. प्रतापाच्या पाठलागावर असलेल्या मोगल सैनिकांची एक टोळी जवळ येत होती. त्या थोड्याशा सैनिकांना सूक्ताने – प्रतापाच्या भावाने – पराभूत करून ठार केले. दोघे भाऊ फार दिवसांनी एकमेकाला भेटत होते.

प्रताप घोड्यावरून खाली उतरला – दोघे भाऊ एकमेकांना मिठी मारून भेटले. तेवढ्यात चेतक धाडकन जमिनीवर कोसळला. प्रताप धावतच चेतकाजवळ आला. चेतकाचे प्राण डोळ्यात गोळा झाले होते. त्याच्या डोळ्यात कृतार्थतेचा भाव प्रतापाला दिसला. चेतक समाधानाने प्रतापाकडे पाहात होता त्याच वेळी त्याचे प्राण त्याला सोडून गेले. नातलगाच्या मृत्यूने दुःख व्हावे तसा प्रतापावर चेतकाच्या मृत्यूने परिणाम झाला –

इ. स. १५७६ मध्ये हळदीघाटच्या युद्धात राणा प्रतापाच्या हाकेला प्रतिसाद देऊन लढलेल्या राजपूत वीरांच्या बलिदानाने मरुभूमीचा इतिहास उज्ज्वल झाला आहे. राणा प्रतापाने दाखविलेल्या धैर्याची आणि शौर्याची तर अनिवार महती आहे. प्रत्यक्ष युद्धातून प्रतापाला जरी या वेळी माघार घ्यावी लागली तरी दिल्लीच्या मोगल बादशाहाला हा हळदीघाटचा हिम्मतबहाद्दर पुढे अनेक वर्षे त्राही त्राही करून सोडणारी एक व्याधीच होऊन बसला.

इ. स. १५९७ पर्यंत राणा प्रतापाने स्वकीयांच्या फितुरीला आणि परकीयांच्या आक्रमणाला तोंड दिले. अखेरीस आपला देश, आपला वंश आणि आपले अपूर्ण ध्येय यांची चिंता करीतच राणा प्रताप इहलोक सोडून गेला.

◆ ◆ ◆

3077
3393

# २. "खुणा सांगती अमरकथा !"



अमरसिंह

राठोडांच्या राजधानीत राहणाऱ्या लोकांना दरबार ही निश्चितच काही नवी किंवा अपरिचित बाब वाटत नसे. या राजधानीतल्या पौरजनांनी असे कित्येक दरबार पाहिलेले होते. राजा उदयसिंहाचा, राजा सूरसिंहाचा आणि असेच किती तरी ! राजा गजसिंह गादीवर आल्यानंतरही यापूर्वी कित्येक दरबार भरले होतेच की ! प्रत्येक दरबाराच्या वेळी राजधानीत आलेले मांडलिक, सरदार, मानकरी आणि त्यांच्याबरोबरचा लवाजमा यामुळे त्या दिवशी सारे शहर कसे गजबजून जाई. सारी राजधानी उत्साहाच्या अतिरेकाने बहरून आलेली असे –

अगदी अलिकडेच युवराज अमरसिंहाच्या सत्कारासाठी असाच एक मोठा दरबार भरला होता. युवराज अमरसिंह याने तब्बल बारा तास एका प्रचंड वाघाशी झुंज घेऊन त्याला जिवंत पकडले. त्या वेळी त्या दोन वाघांच्या दर्शनासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी दरबाराच्या जागी जमल्या होत्या. अमरसिंहाचा जयजयकार दाही दिशांत दुमदुमून राहिला होता. आपापल्या परीने प्रत्येकजण अमरसिंहाच्या शौर्याची तारीफ मुक्तकंठाने इतरांना सांगत होता. त्या दिवशीच्या दरबारांतली उपस्थिती स्वयंस्फूर्त होती. जनतेच्या उत्साहाला उधाण आले होते—

अमरसिंह हा राजा गजसिंहाचा थोरला मुलगा. त्याला शिकारीची जबरदस्त आवड होती. दिवसच्या दिवस रानोमाळ हिंडून श्वापदांचा शोध घेणे हा त्याचा छंद होता. तरुण वयात अशा प्रकारच्या छंदातून साहसी वृत्तीचे प्रदर्शन होते. त्यातून हा अमरसिंह विशेष शूर व कर्तबगार, पण बेछूट वृत्तीचा होता. त्यामुळे त्याच्या या साहसी छंदाला कित्येकदा बेजबाबदार वर्तनाचा अर्थही प्राप्त होत असे. जनतेला आपल्या या शूर, धाडसी युवराजाबद्दल अपार प्रेम वाटत असे; पण राजा गजसिंह आणि त्याचे मंत्री यांना मात्र चिंता वाटत असे. काही झाले तरी अमरसिंह आजचा युवराज म्हणजेच उद्याचा राजा आहे ही गोष्ट त्यांना विसरता येत नव्हती. राजा गजसिंहाने आपल्या मनातली ही हुरहूर अमरसिंहाच्या कानी घातली होती. तरीही त्याच्या बेछूट वर्तनाला आळा बसला नाही. शिकारीच्या साहसी जीवनातली रंगत त्याला वारंवार रानात खेचून नेत राहिली आणि अखेरीस राजा गजसिंहाला तो कठोर निर्णय घ्यावा लागला—

इ. स. १६३४ म्हणजेच शके १५५६ च्या वैशाखात तो निर्णय जाहीर करण्यासाठी दरबारची घोषणा केली गेली—म्हणूनच त्या

दरबाराविषयी सर्वांच्या मनात विलक्षण कुतूहल निर्माण झाले होते. दरबारची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतशी जनतेची उत्सुकता वाढत गेली – त्या दिवशीचा दरबार होताच तसा वैशिष्ट्यपूर्ण !

आजच्या दरबारात राजा गजसिंहाकडून ती घोषणा होणार होती. युवराज अमरसिंह याच्याकडे असलेले युवराजपद काढून घेण्यात येणार होते. राजा गजसिंहानंतर गादीवर जसवंतसिंग हा अमरसिंहाचा धाकटा भाऊ येईल असा जाहीर निर्णय घेण्यासाठी या दरबाराची योजना होती. राजनिष्ठ प्रजाजनांना हा अप्रिय आदेश सुनावला जाणार होता.

राजपद अमरसिंहाला नाकारण्यात येणार होतेच; पण त्याचबरोबर त्याला आता राज्याच्या हद्दीबाहेर जावे लागणार होते. आपण लाडक्या अमरच्या सहवासाला मुकणार याचे दुःख काहींच्या मनात उफाळून येत होते; पण इलाज नव्हता !

दरबार भरला. रीतीप्रमाणे अमरसिंहाला तो निर्णय राजा गजसिंहाने ऐकवला. अमरसिंह मान खाली घालून निमूटपणे ऐकत होता. नंतरचा सुतकी समारंभ सुरू झाला. हद्दपारीच्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठी विशिष्ट पोशाख, विशिष्ट ढाल-तलवार दरबारात आणली गेली. काळ्या रंगाचा सुतकी पोषाख अमरसिंहाच्या अंगावर चढविण्यात आला. पाठीवर ढाल आणि कमरेला तलवार बांधण्यात आली. यानंतर काळ्या रंगाच्या घोड्यावर अमरसिंह स्वार झाला.

" अमर, या गादीवरचा तुझा जन्मसिद्ध हक्क आजपासून संपला. आता मरुभूमीच्या सीमेपार तू कुठेही जाऊ शकतोस ! " राजा गजसिंहाने अखेरची आज्ञा केली. त्यानंतर मात्र त्याला आपले दुःख आवरणे अशक्य झाले – " बेटाऽ !" त्याच्या तोंडातून अत्यंत करुणामय

असा उद्‌गार बाहेर पडला. इतका वेळ दाबून धरलेल्या अश्रुधारा त्याच्या डोळ्यांतून गालावरून ओघळू लागल्या.

दरबारासाठी जमलेल्या अनेकांनाही त्या वेळी अपरिमित दुःख झाले. भारावलेल्या नेत्रांनी अमरसिंहाकडे पाहून त्यांनी आक्रोश केला. कित्येकजण अमरच्या आसपास गर्दी करू लागले.

अमरसिंह शांतपणे वागत होता. त्याच्या स्वभावात नसलेली शांतता या वेळी मात्र सर्वांच्या अनुभवास आली. अमरसिंह निघाला. आपली माणसे, आपले राज्य, आपले सवंगडी सोडून तो दूर जाणार होता; पण त्याचे खरे चाहते आणि सवंगडी मात्र त्याला सोडायला तयार नव्हते. कित्येकांनीं अमरसिंहाबरोबर राज्यत्याग करण्याचा निश्चय केला. अमरसिंहाबरोबर तेही राज्य सोडून निघाले.

अमरसिंह काळ्या घोड्यावरून जात होता. सीमेपार होण्यासाठी त्याला जायचे होते. त्याला एकट्याला ती आज्ञा झाली होती; पण त्याचे कित्येक चाहते त्याच्याबरोबर स्वयंस्फूर्तीने निघाले होते. त्यांनी आपणहून हद्दपारीचा हुकूम स्वतःवर बजावला होता. अमरसिंह मरुभूमीच्या सीमेपार झाला. त्याने सरळ दिल्लीच्या रोखाने दौड चालू ठेवली आणि लवकरच तो दिल्लीला येऊन पोहोचला.

एके काळी राजेपणाची स्वप्ने पाहणारा अमरसिंह आता एक सामान्य राजपूत योद्धा बनला होता; पण म्हणून त्याचे शौर्य, त्याची कर्तबगारी, त्याचा निश्चय थोडाच कमी होणार होता. यापुढे स्वतंत्रपणे जगणे आवश्यक झाले होते एवढेच! अमरसिंहाने दिल्ली दरबारात आपल्या स्वतःच्या कर्तबगारीवर काम मिळविण्याचे ठरविले. तो दिल्लीच्या बादशाहाकडे अर्ज घेऊन गेला—

दिल्लीच्या गादीवर या वेळी शाहजहान बादशाहा होता. त्याने अमरसिंहाची योग्यता आणि उपयुक्तता हेरली. शिवाय अशा राजपूत वीरांना हाताशी धरून आपली महत्त्वाकांक्षा पार पाडण्याचा डाव त्याला खेळावयाचाच होता. अमरसिंहाला झालेली हद्दपारीची आज्ञा योग्य ठरवून इकडे राजा गजसिंहाला त्याने खूष केले तर उलट अमरसिंहाला अभय देऊन मोठ्या गौरवाने त्याला आपल्या नोकरीत घेतले.

शौर्य आणि साहस हेच अमरसिंहाच्या कर्तृत्वशाली व्यक्तिमत्वाचे विशेष गुण होते. शस्त्रांची संगत हीच अमरसिंहाच्या स्वभावाला रुचणारी एकमेव शक्ती होती. धाडसाचे क्षण हेच अमरसिंहाच्या जीवनातले खरे आकर्षण होते. तो अंतर्बाह्य योद्धा होता. त्यामुळे दिल्ली-दरबारात लवकरच त्याने आपले वैशिष्ट्य प्रस्थापित केले. बादशहाने मेहेरनजर होऊन अमरसिंहाला तीन हजारांची मनसबदारी, ‘राव’ ही किताबत आणि मारवाडातील नागूरचे छोटे राज्य बहाल केले.

अशा प्रकारे आपल्या कर्तबगारीवर अमरसिंहाने ऐश्वर्य प्राप्त करून घेतले. त्याच्या स्वतंत्र वृत्ती पुन्हा उफाळून आल्या. बेछूट जीवनाला आरंभ झाला. जुना शिकारीचा छंद परत जडला. दिवसच्या दिवस रानावनात जाऊ लागले. पण काही झाले तरी अमरसिंह आता शाहाजहान बादशाहाचा मनसबदार होता. जबाबदार दरबारी मानकरी होता. त्याचाही त्याला विसर पडू लागला. शिकारीच्या शोधात रानावनातून हिंडत राहिल्यामुळे कित्येकदा तर पंधरा-पंधरा दिवस तो कामाकडे दुर्लक्ष करू लागला. शाहाजहान बादशाहाच्या कानी ही हकीगत गेली. त्याने जाब विचारण्यासाठी अमरसिंहाला बोलावून घेतले. अमरसिंह आपल्याच धुंदीत होता. तो बादशाहासमोर हजर झाला.

" राव अमरसिंह ! आप हमारे दरबारके मनसबदार है. हम चाहते है की अपनी दिलेरीसे आप मनसबदारीके हकमे तरक्की करे" बादशाहा एकदम विषयाकडे न वळता चुचकारून पाहात होता.

" शुक्रिया जहाँपन्हा ! " अमरसिंह अदबीने म्हणाला.

" लेकिन आपण आमच्या मेहेरबानींचा भलताच अर्थ करता आहात. फर्ज़ विसरून वागता आहात. " बादशहाने सूचना केली.

" नही नही. मी तस काहीच केलेल नाही. " अमरसिंह म्हणाला.

" अमरसिंहजी ! आम्ही यकीन ठेवून आहो; पण आपण पंधरा-पंधरा दिवस दरबारात गैरहजर राहाता. शिकार खेलना बहादरका शौक हो सकता है; लेकिन सिर्फ शौक. त्यासाठी फर्ज आदा करण्यात कसूर झालेली आम्हाला खपणार नाही. का शिकारींच्या बहाण्यान आपण निराळ्याच काही कारस्थानात तर– " बादशाहाचा स्वर चढत गेला.

" नामुमकीन ! जहाँपन्हा, अमरसिंह राजपूताचा बच्चा आहे. प्राण गेला तरी इमान आणि जबान फिरणार नाही. "

" शाबाश ! हम आपके इमानदारीपर भरोसा रखते हैं. मगर आपण कामात कसूर केली आहेत हे खर आहे. राज्य करणाराला कर्तव्यात होणारी हयगय सहन करता येत नाही. या वेळी आम्ही आपल्याला केवळ दंडाची शिक्षा देतो आहोत. " बादशाह म्हणाला.

" हंः ! मी फक्त शिकारीला गेलो होतो यावर हुजूर विश्वास ठेवतील अस वाटत. दंड कशाबद्दल ते मला समजलेलं नाही. माझ्याजवळ असलेली संपत्तीच बादशाहाना हवी असेल तर मी केवळ– " अमरसिंह रागाने बेहोष होऊन बोलत होता. त्याने आपला उजवा हात कमरेला

लटकणाऱ्या समशेरीवर ठेवला आणि तो म्हणाला – " मी केवळ या समशेरीलाच माझी दौलत समजतो. "

यानंतर अमरसिंहाला ' आप जा सकते हैं ' अशी आज्ञा देण्यात आली. अमरसिंहाने भर दरबारात समशेरीवर हात ठेवून दिलेल्या उत्तराने शहाजहान मनातून फार चिडला होता. अमरसिंह गेल्यानंतर बादशाहाने बक्षी सलाबतखानाला पुढे बोलावले –

" बक्षी, अमरसिंहाकडून दंड वसूल करण्याचा आमचा निश्चय आहे. त्या कोवळ्या पोराची आता गय केली तर त्याची मिजास वाढत जाईल. आपण जातीनं यात लक्ष घाला. आम्ही या कामासाठी आपली खास नेमणूक केली आहे. " बादशाहाने फर्मावले.

" जो हुक्म ! " असे म्हणून सलाबतखानाने कुर्निसात केला.

अमरसिंह दरबारातून घरी आला तेव्हा त्याचे मन काहीसे त्रस्त झालेले होते. लहानपणापासून आपण जोपासलेला शिकारीचा छंद लोकांच्या डोळ्यात का सलतो ? या प्रश्नाचे उत्तर त्याला सापडत नव्हते. बेचैन होऊन विचारमग्न अवस्थेत तो येरझाऱ्या घालीत होता. याच छंदापायी आपला राज्यावरचा जन्मसिद्ध हक्क आपण गमावून बसलो आणि आता याच छंदापायी आपल्या पुढच्या आयुष्यात संकटे येणार की काय ? अशा तऱ्हेचे विचार त्याच्या मनात येत होते; पण पुन्हापुन्हा विचार करूनही आपले काही चुकते आहे हे मान्य करायला त्याचे मन तयार नव्हते. तो या विचारांमुळे अधिकाधिक अस्वस्थ मात्र होत होता –

" सिंहजी, " एका नोकराने त्याला अभिवादन करीत म्हटले, " बाहेर दरबारातून आलेले बक्षी सलाबतखान थांबले आहेत. ते आपली भेट मागताहेत. "

" ठीक आहे. " असे म्हणून त्याच मनःस्थितीत बाहेर येऊन अमरसिंह सलाबतखानाला भेटला.

" कहिये खानसाहेब, कैसे आना हुआ ? "

" राव अमरसिंह, मै आया हूँ बादशाह सलामत के हुक्म की तामील करने. " सलाबतखान म्हणाला.

" काय हुकूम आहे बादशाहांचा ? " अमरने विचारले.

" आपल्याला करण्यात आलेला दंड वसूल करायचा हुकूम आहे मला. "

" हं: ! दंड ! आमची एवढीशी चूकही दंडपात्र होते हं ? "

" अफसोसकी बात है अमरसिंह. लेकिन आपण बादशाहांच्या समोर जो बेमुर्वतखोर बर्ताव केलात त्याचा अन्जाम आहे हा. "

" खानसाहेब प्रत्यक्ष बादशाहांना जे आम्ही सुनावलं तेच आपल्या-लाही ऐकावं लागेल. याद राखा ! अमरसिंहानं स्वाभिमान विकून कोणाची गुलामी पत्करलेली नाही. आमच्या मनगटातला जोर ओळखूनच त्या धूर्त बादशाहानं आम्हाला जवळ केलं आहे. तुमच्यासारखी लाळघोटी माणसं कारस्थानानं मिळवितात तसला मान आम्ही मिळवलेला नाही !"

" अमर ! तू कोणासमोर बोलतो आहेस ही मिजासखोर भाषा ! बक्षी, सलाबतखान म्हणजे काय तुला एखादा राजपूत नौकर वाटला ? आदबसे पेश आवो अमर. " सलाबत चिडला होता.

" अमर म्हणून पुकारून माझी बेअदबी करण्याचा खानसाहेब तुम्हाला कोणी अधिकार दिला — ? आकडेमोडी पलीकडे तुझ्या मनग-टाला दुसरे श्रम माहीत नाहीत हे ध्यानात आण. अमरसिंहाशी बोलताना बादशाहांनीसुद्धा सांभाळायची आदब तू मोडतो आहेस. नीट बर्ताव कर नाही तर — "

" हम दरबारके बक्षी है. तुम जैसे दिवानोंकी हम इज्जत करेंगे ! अमरसिंह रक्कम ताबडतोब मिळाली पाहिजे एवढच मी म्हणतो. नाही तर त्याचा परिणाम खतरनाक होईल. "

" ठीक आहे तर. तो खतरनाक परिणाम होऊ दे किंवा दुसर काही घडू दे. आपण येथून जाऊ शकता. " अमरसिंहाने उत्तर दिले.

" मी बादशाहांचा प्रतिनिधी म्हणून आलो आहे. माझी बेइज्जत म्हणजे प्रत्यक्ष बादशाहांचा अपमान आहे. " सलाबतखान म्हणाला.

" आपण त्याचा कसाही अर्थ करा. आपण जाऊ शकता — जा ! "

सलाबतखान तेथून निघाला तो थेट बादशाहापाशी जाऊन पोहोचला. अमरसिंहाच्या घरी घडलेली हकीगत तिखटमीठ लावून त्याने बादशाहाला सांगितली. प्रत्यक्ष बादशाहांचाच अपमान अमरसिंहाने केला आहे अशी बादशाहाची समजूत करून देण्यापर्यंत त्याने ती हकीगत खुलवून सांगितली. बादशाहाच्या रागाला सीमा राहिली नाही. त्याने ताबडतोब अमरसिंहाला फर्मान धाडले.

अमरसिंहाला बादशाहासमोर हजर होण्याचे फर्मान मिळाले. त्यातील ताबडतोबी आणि भाषा यावरून अमरची खात्री झाली की, सलाबतखानानेच बादशाहाचे कान भरले असावेत. त्याला डोळ्यांसमोर सारखी सलाबतखानाची मग्रूर मूर्ती दिसू लागली. बादशाहाबद्दलही त्याचे मन कलुषित झाले; पण अजून त्याने बंडखोरीचा निश्चित निर्णय घेतला नव्हता. म्हणून त्याने बादशाहासमोर हजर होण्याचे ठरवून टाकले.

अमरसिंह शस्त्रसज्ज होऊन ' दिवाण-इ-खास 'कडे निघाला. अमरसिंहाने आपले विश्वासू सहकारी बरोबर घेतले होतेच. अमरसिंह लाल किल्ल्याजळ पोहोचला. आतापर्यंत बहुतेकांना बादशाहा अमरवर

रुष्ट झाल्याची वार्ता ठाऊक झाली होती. त्या सर्वांच्या नजरांतून डोकावणारी उत्कंठा अमरसिंहाच्या मनात कालवाकालव निर्माण करीत होती. सलाबतखानाच्या उपद्व्यापांची कल्पना त्याला बेचैन करीत होती. जसा तो अधिकाधिक पुढे जात होता तसा त्याचा राग अनावर होत चालला होता. अमरसिंह दिवाण-इ-खास मध्ये पोहोचला आणि बादशाहाला कुर्निसात करून तीनहजारी मनसबदारांच्या जागेत जाऊन उभा राहिला.

बादशाहा शहाजहान आपल्या तख्तावरून क्रोधाविष्ट नजरेने अमरकडे पाहू लागला. तेव्हा त्याच्या नजरेतील क्रोध आणि लाली तितक्या दुरूनही अमरसिंहाला जाणवली; पण तिकडे विशेष लक्ष न देता तो आपल्या शोधक नजरेने सलाबतखान कोठे दिसतो का ते पाहू लागला. बादशाहापासून जवळच सलाबतखान उभा होता. खान आणि अमर यांच्यामध्ये पाचहजारी आणि सातहजारी मनसबदारांची जागा होती.

" बक्षी, दरबारके सामने वह किस्सा बयान करो " बादशाहाने सलाबतखानाला फर्माविले. खानाने बादशाहाला सांगितलेली सगळी माहिती बिनचूक निवेदन केली. ती हकीगत ऐकत असताना अमरसिंह मनातून अतोनात चिडला. पण त्याने आपला राग प्रकट केला नाही. यानंतर बादशाहाने ' अमरसिंहाला काही सांगावयाचे आहे काय ? ' असा प्रश्न केला. साऱ्यांच्या नजरा अमरसिंहावर रोखल्या गेल्या.

अमरसिंहाने जागेवरूनच प्रथम बादशाहाला कुर्निसात केला. त्यानंतर अत्यंत धीमेपणाने पावले टाकीत तो पुढे निघाला. पंचहजारी, सातहजारी मनसबदारांची जागा मागे टाकून तो पुढे जात होता. अखेरीस ज्या ठिकाणी उभा राहून सलाबतखानाने आपले निवेदन केले

होते तेथे अमरसिंह आला. सलाबतखानाकडे एकवार तिरस्काराने पाहून त्याने बादशाहाला पुन्हा एकदा मुजरा केला. तिरक्या नजरेने अमरसिंह खानाकडे पाहातच होता. खानाच्या नजरेतली आणि मुखावरची कुत्सित हास्याची भावना त्याला स्पष्टपणे जाणवत होती. मुजरा करून उभा राहिल्यावर बादशाहाकडे धिटाईने पाहात अमरसिंह म्हणाला – " जहाँपन्हा ! " अमरसिंहाच्या बोलण्याचा बादशाहाच्या मनावर कितपत परिणाम होतो ते पाहण्यासाठी सर्वांच्या नजरा बादशाहाकडे वळल्या.

याच वेळी सलाबतखानाकडे झेप घेऊन, अमरसिंहाने येतानाच बरोबर आणलेल्या कट्यारीने खानाच्या छातीवर वार केला. नेमक्या ठिकाणी बसलेल्या वाराने बेसावध खान सावध होण्यापूर्वीच गतप्राण होऊन कोसळला –

' तोबा, तोबा, ' असा पुकारा करीत अमरसिंहाला पकडण्यासाठी अनेक दरबारी पुढे येणार एवढ्यात अमरसिंहाने तलवार उपसली आणि एक दीर्घ छलांग मारून तो तख्तापाशी आला. तलवारीचा असा काही जबरदस्त वार त्याने खुद्द बादशाहावर केला की घाव लागलाच असता तर – पण तो वार चुकून अमरसिंहाची समशेर तिथल्या संगमरवरी स्तंभावर आदळली. ' खणण् ' असा आवाज झाला. शहाजहान 'इन्शाल्ला' असा पुकारा करीत तख्त सोडून अंतर्गृहात निघून गेला.

अमरसिंहाच्या समशेरीचा, स्तंभावर जोराने पडलेल्या वारामुळे, चुराडा झाला. त्याच्या समशेरीचे तुकडे झाल्यावर पुन्हा त्याने कट्यार उगारली. एव्हाना त्याच्याजवळ येऊन पोहोचलेल्या मोगल वीरांनी त्याला पकडण्यासाठी गर्दी केली; पण त्याही परिस्थितीत अमरसिंहाने केवळ कट्यारीचे घाव घालून पाच मातबर मारले.

अखेरीस अमरसिंहाचा मेव्हणा अर्जुन गौर सलोखा करण्याच्या मिषाने जवळ पोहोचला आणि त्याने अमरवर प्राणघातक वार केला. या फसव्या वाराने अमरसिंह पडला.

अमरसिंहाच्या मृत्यूचा सूड उगवण्यासाठी त्याचे सहकारी बलसिंह चपावत आणि भाईराज कुमावत यांनी त्यानंतर केसरी वस्त्रे परिधान करून लालकिल्ल्यात पुनश्च एकदा प्राणहत्येची आणि कत्तलीची भयंकर दंगल माजविली; पण शेवटी त्या सर्वांना ठार मारण्यात आले—

बुंदीची राजकन्या आणि अमरची पत्नी स्वत येऊन: अमरसिंहाचा पार्थिव देह घेऊन गेली. तिने आपल्या साहसी पतीच्या सहवासाची इच्छा त्याच्याबरोबर सती जाऊन पूर्ण केली.

लाल किल्ल्यातल्या एका स्तंभावर अजूनही अमरसिंहाच्या अद्वितीय साहसाची ही अमरकथा सांगणाऱ्या खुणा दाखविण्यात येतात. ज्या विशिष्ट ‘ बोखारा ’ दरवाजाने हे वीर आत आले तो दरवाजा ‘ अमर-सिंहाचा दरवाजा ’ म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. १६४४ मधील या घटनेचा जबरदस्त परिणाम होऊनच की काय हे प्रवेशद्वार नंतर अनेक शतके बंदच राहिले. पुढे इ. स. १८०९ मध्ये ते कॅप्टन स्टीलने खुले केले. अशी आहे त्या खांबावरील खुणांनी चिरंजीव केलेली अमरसिंहाच्या साहसाची अमरकथा !

◆ ◆ ◆

# ३. ‘ पावनखिंडीतला पुरुषार्थ ’



**बाजीप्रभू देशपांडे**

पन्हाळगडाला सिद्दी जौहरने वेढा घातला होता. शिवाजीराजे पन्हाळगडाच्या भक्कम तटबंदीत सुरक्षित होते. पण किल्ल्याला वेढा पडलेल्या स्थितीत फार दिवस राहणे अशक्य असते. किल्ल्यामध्ये असलेली साधनसामग्री केव्हाना केव्हा संपणारच. बाहेरून मदत मिळत नसल्या-मुळे ही कुचंबणा अटळ आहे. इ.स. १६६० च्या मार्चपासून शिवाजी-राजे पन्हाळ्यात कोंडून पडले. जुलै महिना आता चालू झाला. सतत

चार महिने आतल्या आत कोंडून राहिलेल्या राजांना आता हे सारे असह्य झाले; पण करणार काय ? वेढा तोडायचा म्हणजे एक तर प्रत्यक्ष रणसंग्राम मांडायचा किंवा किल्ला हवाली करण्याची तयारी करून शत्रूच्या स्वाधीन व्हायचे हे दोनच पर्याय—पण नाही शक्तीपेक्षा युक्तीचा वापर अधिक श्रेयस्कर ! म्हणूनच राजांनी तिसरा एक पर्याय शोधला. गडातून निघून जायचे—

पण गडातून निघून जायचे म्हणजे काय ? कोण जाऊ देईल सुखासुखी ? पूर्वी अफझलखानाच्या स्वारीची झालेली धूळधाण ध्यानी घेऊन अनुभवाने शाहाणी झालेली विजापूरकरांची फौज सख्त वेढा घालून बसलेली. त्यात सिद्दी जौहर, फाजलखान, मसूद सिद्दी अशा जागरूक, शूर आणि कर्तबगार सेनानींची देखरेख असताना वेढ्यापार कसे जायचे ? अहोरात्र विचार करूनही न सुचणारी एक कल्पना अकस्मात एका रात्री राजांच्या मनात आली. त्यावर आणखी विचार करून एक धाडसी योजना तयार झाली. बाजीप्रभू देशपांडे, त्र्यंबकपंत भास्कर, गंगाधरपंत इत्यादी निवडक सहकाऱ्यांना राजांनी ती योजना सांगितली. बाप रे ! केवढे धाडस अंगावर घ्यावे लागणार होते. निभले तर ठीक नाही तर जिवावरच बेतणार; पण आता विचार करायला, पर्याय शोधायला काही अवकाशच नव्हता. याच योजनेचा सांगोपांग विचार झाला, तपशील ठरला. सारे पक्के झाले.

* * *

आषाढाचा महिना असल्याने पावसाचा जोर होता. चतुर्दशीची ढगाळलेली रात्र होती. गडावर आणि गडाच्या सभोवार काजळी काळोख पसरलेला होता. गडाखाली मात्र मधून मधून मशाली मिरवताना दिसत होत्या; पण त्याही तुरळक. जौहरचे सैनिक गस्त घालताना त्या

मशालींच्या उजेडात दिसत तेवढे सोडले तर चिटपाखरूही आसमंतात दिसत नव्हते.

अशा त्या भयाण रात्री काही चपळ माणसे राजांनी गडातून बाहेर सोडली. गडाच्या बाहेर पडल्यावर त्यांची कामगिरी सुरू झाली. रातकिड्यांच्या कर्कश किरकिरीची सोबत घेत ही माणसे दबत, लपत, सरकत गड उतरू लागली. थोडे खाली आल्यावर विखरून गेली. पांगून पांगून ती आणखी खाली आली. मधेच होणाऱ्या विजेच्या चमचमाटाने पुढचे दिसल्याचा आनंद त्यांना मिळत नव्हता. कारण त्याच प्रकाशाने त्यांचा घात केला तर? पण अत्यंत सावधपणे लपत छपत या माणसांनी गडाचा तळ गाठला. सबंध गडाला चौफेर हिंडून त्यांनी प्रदक्षिणा घातली आणि सापडली—एक वाट त्याना सापडली. तेथे पाहारा नव्हता. काय कारण असेल? कारण उघड होते. ज्याला वाट म्हणता येईल असा तो भाग नव्हताच. अत्यंत अरुंद आणि अडचणींचा असा तो भाग होता. बस्स! त्या वाटेने थोडे पुढे जाऊनही त्यांनी खात्री करून घेतली. चौकी, पाहारा, वर्दळ काही काही नव्हते तिकडे—त्यांचे काम झाले! राजांनी हेच तर काम सोपवले होते त्यांच्यावर. त्या वाटेला मिळणारी गडाच्या माथ्यापासूनची पाऊलवाट हेरत—ठायी ठायी खुणा पाहात ती सारीजण मग गडावर परतली—राजांच्या योजनेतला एक भाग इथे संपला. ती रात्र संपली.

प्रभातकाळचा मंद वारा वाहू लागला होता. पाखरांची किलबिल ऐकू येत होती. धुक्याचा बुरखा घेऊन सारी सृष्टी अजूनही साखरझोप घेत होती. अशा वेळी पन्हाळगडावर मात्र एक जबरदस्त मसलत आकार घेत होती.

शिवाजीराजांच्या महालातला दिवा सारी रात्र जळून थकल्याने मंदावत चालला होता. महाराजांनी आणि गंगाधरपंत वगैरे मुत्सद्यांनी

रात्रभर जागून मसलत पक्की केली होती. गंगाधरपंत बैठकीतून थोडे लवकर उठले. स्नानादी उरकून, नवा पोषाख घालून, पंत पुन्हा थोड्याच वेळात हजर झाले. राजांनी थोडासा विचारविनिमय करून गंगाधर-पंतांना पत्राची थैली दिली. त्या पत्रावर राजांची मोहोर होती. पंत महालाबाहेर पडले त्या वेळी महालाबाहेर नजराण्यांची ताटे घेतलेले, पांढरा स्वच्छ पोषाख घातलेले, काही सैनिक उभे होते. पंतांनी इशारा करताच सर्वजण निघाले. गडाचे दरवाजे उघडले आणि मिटले. पंत आपल्याबरोबरच्या माणसांसह गड उतरू लागले.

दिवस आता चांगलाच वर आला होता. प्रकाशाने सारे वातावरण उजळून निघाले होते. तेवढ्यात गडाखाली वेढ्यातल्या पहारेकऱ्याला काही माणसे गडावरून उतरताना दिसली. चोहोकडे 'हुश्यार' राहाण्याची वर्दी गेली. स्वतः जौहरला ही बातमी समजली. तो तातडीने तंबूबाहेर आला; पण एवढी थोडी माणसे गड उतरताना पाहून त्याच्या मनावरचे दडपण दूर झाले. कोण असतील हे लोक? खाली कशाला येत आहेत? पण लवकरच त्याला उमगले की, शिवाजीचा वकील तर नसेल? हो हो तेच ते. त्याने आपल्या लोकांना हुशार राहाण्याची ताकीद दिली.

" वह लोग नीचे पहुँचतेही हमे इतला करो. उनको हमारे सामने पेश करो. उनको आँखोंसे बाहर होने नहीं देना!" त्याने एवढे सांगून टाकले आणि स्वतः तयार होण्यासाठी तो तंबूत परतला.

पंत उतरत होते. छावणीतले लोक त्यांच्यावर सख्त नजर ठेवून होते. पण लवकरच हा शिवाजीचा वकील आहे अशी सर्वांची खात्री पटली. पंतांना घेऊन एक अधिकारी जौहरच्या शामियान्याकडे निघाला. शिवाजीने वकील पाठविला म्हणजे त्याला सल्ला करायचा आहे ही बातमी छावणीत वाऱ्यासारखी वेगाने पसरली—

आज या गोष्टीला चार महिने होत आले. पन्हाळ्याला वेढा घालून बसलेल्या या फौजेने ऊन्ह, पाऊस, वारा, थंडी आणि दिवसरात्र न पाहता सारखी मेहनत केली होती. आता सल्ला झाला म्हणजे हे सर्व संपणार होते. फौजेत या विचाराने केवढा आनंद निर्माण केला होता. अगदी नाही म्हटले तरी थोडीशी शिथिलता आली होती—

जोहरच्या शामियान्यात पंतांनी प्रवेश केला आणि अत्यंत आदबीने त्याला मुजरा करून पंत हात जोडून उभे राहिले. नंतर त्यांनी शिवाजीराजांनी पाठविलेले नजराणे पुढे केले. जौहर पंतांच्या आदबशीर वागण्याने आणि शिवाजी शरण आला या विचाराने धुंद होत गेला. पंतांनी पत्राची थैली पुढे केली. जौहरने पत्र वाचायला सुरुवात केली—

“ आपण फार मोठे, मी अगदी छोटा. आपण जबरदस्त असामी, मी एक साधा शिपाई. आपण वडील, मी धाकटा. आजवर केलेले सर्व माफ करा, मी शरण आहे. आपण अभय द्या, मी दर्शनाला येतो. जे जे मिळविले, ते ते आपल्या हवाली करतो. बिनशर्त शरण येतो. गडाखाली येऊन भेटतो. ” अशा अर्थाचे ते पत्र होते. भाषेत आणि विचारात नम्रता होती. जौहरला पत्र वाचून समाधान वाटले. त्याच्या अंतःकरणात आनंदाच्या ऊर्मी निर्माण झाल्या; पण लागलीच त्याने स्वतःला सावरले.

अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी घडलेले सर्व त्याला आठवले. शिवाजी हा महाधूर्त, कारस्थानी, कपटी आणि लबाड आहे. आजवर त्याने असाच डाव करून अनेकांना फसविले आहे. आपण सावधानतेने वागले पाहिजे. या पत्रात बिनशर्त शरणागतीची भावना आहे. शिवाजी स्वतः भेटायला यायला तयार आहे; पण – पण त्याच्या मनात काही कपट असले तर ? पण आपण गाफिल राहिलो नाही म्हणजे झाले.

शिवाय आपण काही वेढा उठवून किंवा ढिलाई करून त्याला भेटायला जात नाही, तर तो खाली येणार आहे. आपल्या पस्तीस हजार फौजेच्या जबड्यात तो या वेळी सापडणार आहे. तेव्हा दगा करणे त्याला कठीण जाईल, असेही विचार त्याच्या मनात आले.

पंत उत्तराच्या अपेक्षेने जौहरसमोर खाली मान घालून उभे होते. जाहरने आपल्या परीने खूप विचार केला. प्रश्न विचारले. पंतांनी उत्तरे दिली. बोलणी झाली. शिवाजीने जौहरच्या छावणीत येऊन भेट घ्यावी. ती भेटही केव्हा तरी नव्हे उद्याच, असे ठरले. पंत जौहरच्या कोणत्याही सूचनेला केवळ संमतीच देत राहिले. सर्व अटी कबूल करीत गेले. त्यामुळे जौहरच्या मनातला संशय फिटला. शिवाजी खरोखर शरण आला याबद्दल खात्री पटून त्याने आपली मंजुरी दिली.

शिवाजीच्या शरणागतीची बातमी आतापर्यंत छावणीत पसरली होती. अगदी टोकाच्या पाहाऱ्यापर्यंत या बातमीला जाता आले. कारण सर्व यातायात आता संपणार होती. आनंदाने, गर्वाने फुगून गेलेल्या फौजेत काहीशी गाफीलपणाची धुंदी पसरत चालली होती. ही गाफिली व त्यातून अगदी सहजपणे येणारी ढिलाई हाच शिवाजीराजांच्या योजनेतला दुसरा भाग होता. त्यातही यश आले.

पंत जौहरचा निरोप घेऊन गडावर आले. उद्या लढाई संपणार म्हणून तळातल्या फौजेत ढिलेपणा आला; पण उलट गडावर मात्र अधिकच वेगाने आणि दक्षतेने हालचाली सुरू झाल्या –

तो सर्व दिवस शिवाजीराजांनी विचारविनिमय, सल्लामसलत आणि अनेकांना अनेक प्रकारच्या सूचना देण्यात घालविला. रात्र जवळ येत चालली तसे सर्वांच्या मनावरचे दडपणही वाढत गेले. राजांनी निश्चित केलेल्या योजनेतला आता तिसरा आणि महत्त्वाचा भाग सुरू होणार

होता. आतापर्यंतच्या योजलेल्या सर्व टप्प्यांत यश मिळाले होते. आताचा टप्पा म्हणजे त्या योजनेचा कळसच होता. त्या रात्री हेरांनी हेरून ठेवलेल्या वाटेने गडाखाली जाऊन राजे ढिल्या पडलेल्या बंदोबस्तातून वेढ्यापलीकडे निघून जाणार होते; पण सर्व सुरळीत होईल किंवा व्हावे यासाठी अतिशय काळजी घेणे जरूर होते. गडावरच्या सर्वांनाच काही तरी चालले आहे हे जरी समजले होते तरी काय चालले आहे याची जाणीव मात्र फार थोड्या लोकांनाच होती. इतक्या सावधानतेने सर्व गोष्टी चालू होत्या. योजल्याप्रमाणे सारे काही पार पडावे असा प्रयत्न जारी होता –

अखेर रात्र झाली. तशी हालचालींना गती आली. शिवाजीराजे तयार झाले. बाजीप्रभू देशपांडे तयार झाले. अगदी आवाज न करता जवळजवळ पाचसहाशे मावळे जमा झाले. सर्वांच्या मनावर एक प्रकारचे दडपण होते; पण फार मोठ्या महत्त्वाच्या कामासाठी आपली निवड झाली याचा मनात अभिमानही होता.

सर्व कारभाऱ्यांची भेट घेऊन, त्यांना शिवाजीराजे म्हणाले, " आम्ही आता निघणार. आतापर्यंत योजनेतला प्रत्येक भाग नीट पार पडला आहे. तेव्हा ईश्वराच्या मनात आपलं चांगलं करायचं आहे याच भरवशावर आम्ही निघालो आहोत; पण कदाचित दैवाचे फासे उलटे पडले आणि आमचं काही बरवाईट – "

" नका नका महाराज " जमलेल्या सहकाऱ्यांनी राजांचे वाक्य तोडले. " नाही महाराज असं होणार नाही. आम्ही होऊ देणार नाही ! "

" तुमच्या सर्वांच्या याच निष्ठेवर तर आपल्या सर्व योजना, आपलं स्वराज्याचं स्वप्न उभं आहे. आम्ही तरी काय केवळ स्वराज्याचे पाईक आणि आपणासारख्यांच्या निष्ठेचे गुलाम आहोत. आजचं धाडस त्याच

निष्ठेनं पार पडेल असा आम्हीही भरवसा वाळगून आहो. पंत, गडाच्या रक्षणात ढिलाई होऊ नये हीच आमची इच्छा. चला बाजी, निघायलाच हवं."

रात्र चढत होती. त्या वेळी शिवाजीराजांना घेऊन पालखीतून ठरलेल्या वाटेने बाजी गड उतरत होते. त्यांच्यावर केवढी जोखीम येऊन पडली होती. मनावर हे जबाबदारीचे ओझे घेऊन त्या अंधारात सारेजण न आवाज करता गडाच्या उतरणीवरून खाली सरकत होते. नशिबाने एका बाबतीत चांगलाच हात दिला होता. त्या वेळी पावसाने झोड उठवली होती. सारी मंडळी हेरांनी टिपलेल्या पाऊलवाटेने पायथ्याशी येऊन पोहोचली.

गडाभोवतीच्या वेढयाजवळ आल्यावर क्षणभर थांबून बाजींनी अंदाज घेतला. पाऊस आणि अंधार यांच्या मदतीला पाहऱ्यातील गाफीलपणा होताच. जौहरची ताकीद असूनही उद्याच्या यशाच्या धुंदीने सैनिक सुस्तावले होते. राजांना घेऊन निघालेल्या मंडळींना त्यामुळे सहज वेढा ओलांडता आला. एथवर तर सर्व ठीक झाले. आदल्या रात्री हेरांनी केलेल्या अचूक टेहळणीचे कौतुक करीत आणि गंगाधरपंतांनी शरणागतीची हूल दाखविण्यात केलेल्या कामगिरीचे लाघव आठवीत ईश्वरावर भार टाकून ही मंडळी वेढयापार पोहोचली. आता विशाळगडाच्या रोखाने आगेकूच सुरू झाली. वेग वाढला. पालखीचे खांदे टप्प्याटप्प्याने पण जलद बदलून मावळे राजांना घेऊन विशाळगडाकडे धावत होते; पण आता सर्वजण शत्रूच्या दाढेत होते. मधेच विजेच्या चमकण्याने उजेड होई तेव्हा पोटात भीतीचा गोळा उठे; पण अजूनही कोणी पाहिले नाही ही समाधानाची बाब होती. आगे-मागे, आजूबाजूला चौफेर नजर ठेवून मावळे धावत होते. कुठे आवाज झाला तर थांबून पाहायलाही वेळ नव्हता. विशाळगडाच्या दिशेने धावणे आणि तेही

जल्दीने एवढेच सर्वांच्या मनात होते. पण हा आवाज – नक्कीच माणसांचा. झुडुपाआड होते कुणी तरी. का भासच ? नाही. या वेळी मात्र नक्कीच कोणीतरी माणूस ! पण कोण ? छेः ! थांबणे तर नाहीच अधिक गतीने जायचे – बाजींच्या छातीत धडधडू लागले. गती, जलदी, लवकर पाय उचला एवढाच ध्यास !

राजाना घेऊन निघालेली मंडळी विशाळगडापासून निम्म्या वाटेवर येऊन पोहोचली होती. आशा-निराशेच्या हिंदोळ्यावर स्वार झालेली ती मने अविश्रान्त धावत होती. तेवढ्यात मागे घोड्यांच्या टापांचा आवाज दूरवर ऐकू आला –

छावणीच्या वेढ्यातून पार झाल्यानंतर खूप दूरवर असलेल्या एका चौकीतल्या सैनिकांनी ही मावळ्यांची टोळी हेरली होती. त्यांनी धावत जाऊन जौहरला वर्दी दिली. त्याला धक्काच बसला ते ऐकून; पण विचार करायला तरी कुठे वेळ होता ? त्याने सिद्दी मसूदला तावडतोब घोडेस्वार घेऊन पाठलागाचा हुकूम दिला; पण ती मोगलांची फौज होती. तयारीत काही वेळ फुकट गेला. जौहर बेचैन होऊन त्यांना घाई करीतच होता. ज्यांनी मावळ्यांना पाहिले होते त्यांनी केवळ दिशा दाखवली होती. थोडा वेळ माग काढण्यात गेला. घोड्यावरून वेगाने जाता येईल हा अंदाज आडवाट, त्यात चिखल यामुळे खोटा ठरला. पण तरीही जिद्दीने सिद्दी मसूद पुढे निघाला –

हे सर्व होईपर्यंत सराईत मावळ्यांनी चिखल तुडवीत बरेच अंतर काटले होते. आता ते घोडखिंडीजवळ येऊन पोहोचले होते; पण शत्रूच्या आगमनाची चाहूल आता स्पष्टपणे ऐकू येत होती. पाठलाग होत असता पुढे जाणे अशक्य होते; पण मग काय करायचे ? उलटून त्यांना तोंड तरी कसे देणार ? बाजीप्रभूंचा विचार पक्का झाला –

" महाराज, आपण असेच पुढे चला. तीनशे मावळे माझ्याबरोबर ठेवतो. ही खिंड शत्रूला चढू देत नाही. आपण झपाट्याने विशाळगडाच्या वाटेने निघा. गडावरून पाच तोफांची इशारत करा. तोवर खिंड रोखतो मी ! "

" बाजी ! " महाराजांना ही परिस्थिती समजत होती. आपण एका मोतीमोल सहकाऱ्याला सोडून जाणार हा विचारच त्यांना सहन होत नव्हता. त्यांच्या त्या एका उद्गारातूनच त्यांच्या मनातली व्यथा बाजींनी हेरली.

" तो विचार या वेळी नको. आधी निघा महाराज. जलदी करा. शत्रूची पहिली टोळी आली. आपण जलदी करा ! "

जड अंतःकरणाने शिवाजीराजे तेथून निघाले. बाजींना आपण सोडून जातो आहोत पण पुन्हा भेट होईल का ? अशा तऱ्हेचे विचार मनात थैमान घालीत होते; पण बाजींनी आग्रहाने राजांना पुढे पाठविले आणि ते स्वतः खिंडीत पाय रोवून उभे राहिले. विशाळगडावरून इशारतीची तोफ ऐकू येईपर्यंत खिंड लढवायची हा त्यांचा निर्धार पक्का झाला.

मसूदचे सैनिक खिंडीतून पार होण्यासाठी निकराने हल्ले चढवीत होते. तितक्याच निकराने बाजींचे मावळे ते हल्ले परतवीत होते. किनाऱ्यावर एकामागून एक येऊन आदळणाऱ्या लाटा जशा फुटतात तशी मोगल सैन्याची गत होत होती.

रात्र संपून दिवस वर आला तेव्हा या लढाईला आणखी जोर चढला. हल्ल्यामागून हल्ले येत होते आणि बाजी दोन्ही हातांत तलवारी घेऊन थयथया नाचत शत्रूचा संहार करीत होते. वादळी वाऱ्यांच्या तालावर त्यांच्या हालचाली होत होत्या. पावसाने चिंब झालेले बाजी अंगावरच्या

जखमा धुण्यासाठी जणू देवाने पाणी अंगावर ओतले आहे अशाच भावनेने लढत होते. विजेच्या गडगडाटाला प्रतिसाद देण्यासाठीच आपलाही आवाज वाढवून ते आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देत होते. केवढे रणकंदन चालू होते ! दिवसभर हेच काम. मधेच एखाद्याने विश्रांतीचा सल्ला दिला की त्या सहकाऱ्याकडे रागाने पाहात बाजी समोर आलेल्या नव्या शत्रूला जोराने घाव घालून मारीत. जणू काही त्या सल्लागारावरचा राग ते शत्रूवर काढीत; पण दिवस इतका वर चढला तरी विशाळगडावरून इशारतीचे आवाज आले नाहीत म्हणून बाजी बेचैन होते –

दिवसभर लढून बाजी आणि त्यांचे मावळे थकत चालले होते. रात्रभरची धावपळ, थोडी संख्या आणि मनावर असलेले जबर दडपण या सर्वांवर मात करून त्यांनी सबंध दिवस लढा दिला. खिंड राखली; पण असे किती वेळ चालणार ? महाराजांकडून अजून खुणेचे आवाज का येत नाहीत ? या विचाराने सर्वांना ग्रासले होते. देवाच्या मनात आणखी किती अंत पाहायचा आहे ? खिंडीत राहिलेल्या मावळ्यांपैकी सर्वजण आवाजाकडे कान लावून समोरच्या हल्ल्याला तोंड देत होते. त्यांना स्फुरण यावे म्हणून बाजी त्वेषाने व जिद्दीने लढत होते. अंगावर अनेक जखमा घेऊन त्यांचे काम चालूच होते––

केवळ मनाच्या सामर्थ्यावर त्यांनी लढाई चालू ठेवली होती. सिद्दी मसूद रागाने, चिडीने हल्ल्यांमागून हल्ले चढवीत होता. त्याची फौज ताज्या दमाची होती. एवढ्यात बाजींवर एक शस्त्राचा जबरदस्त घाव पडला. हेलपाटत थोडे बाजूला हटलेले बाजी त्या घावाने आता पडणार असे सर्वांना वाटले. मावळ्यांनी थोडी कच खाल्ली. ते पाहताच वाताच्या झटक्यात एखाद्या किरकोळ माणसाने घ्यावी तशी उसळी घेऊन बाजी उभे राहिले. पण हे उसने अवसान किती टिकणार ?

धडाड् धड्! धडाड् धड्! तोफा कडाडल्या. बाजींनी अखेर आवाज ऐकू येईपर्यंत खिंड राखण्याचे ब्रीद टिकवले. अगदी वेळेवर तोफांचे आवाज झाले. बाजी जिंकले. धन्य झाले. आनंदाला सीमा राहिली नाही.

घोडखिंड आज पावन झाली. स्वराज्याची निष्ठा पणाला लागली होती. पण निष्ठेने शर्थ केली. पराक्रमी मावळ्यांच्या आणि धैर्यमेरू बाजीप्रभू देशपांड्यांच्या पुरुषार्थाने खिंड पावन झाली. पावनखिंडीत स्वराज्याच्या शिलेदारांनी पुरुषार्थ सार्थ करून दाखविला. इ. स. १६६० पासून ही घोडखिंड पावनखिंड म्हणून ओळखली जाऊ लागली. बाजीप्रभू देशपांडे यांच्या रक्ताने भिजलेल्या या पावनखिंडीत, त्यांच्या रणनिष्ठेने रोवलेल्या टाचा पुरुषार्थाचा अर्थ भावी पिढीला सांगण्यासाठी अजूनही तितक्याच ताजेपणाने खुणा उमटवून दाखवत असतील.

◆ ◆ ◆

# ४. आसामचा अभिमान !



**लाछित बड़फुकन**

मानहा नदीपासून विजय मिळवीत मीर जुम्लाच्या फौजा गौहत्तीवर चालून आल्या आणि राजा जयसिंहध्वजाचा पराभव करून त्यांनी गौहत्ती जिंकली. इ. स. १६६३ उजाडले ते हे असे.

घनदाट अरण्यांनी नटलेला आणि ब्रह्मपुत्रेच्या कुशीत घुसून तीवरून वाहणाऱ्या थंडगार वाऱ्यात सारे अंग घुसळविणारा आसाम आज पारतंत्र्याची वाटचाल करीत होता. कामाक्षीच्या मंदिरात मृदंगांच्या साथीवर मणिपुरी नृत्यात दंग होणारी आणि भक्तिभावाने रक्तवर्णाची कमळे वाहून देवीला पुजणारी आसामी जनता एकदम चिंताक्रांत झाली होती. देवीने त्यांची परीक्षाच घ्यावयाचे ठरविले असावे. जवळजवळ

सबंध पश्चिम आसाम मोगली फौजांनी पादाक्रांत केला होता. अखेरीस घिलाझरीला राजाने अपमानकारक अटी कबूल करून तह केला. काही काळ स्वस्थतेचा लाभला; पण आपण असामियांच्या विश्वासाचा घात केला या दुःखाने जयसिंहध्वज राजा मनातून खचत चालला होता. त्याने राजधानी गौहत्तीहून नामरूपला नेली. तेथेच ती काळी घटका आली – राजा आता शेवटचे क्षण मोजू लागला. पराभवाच्या जाणिवेने खचलेली जनता राजाच्या आजाराने व्यथित झाली; पण काळ कोणासाठी थांबतो का? राजा जयसिंहध्वज इहलोक सोडून गेला.

चक्रध्वजसिंह गादीवर आला. नवा राजा नव्या आशा निर्माण करील ही जनतेची आकांक्षा लवकरच फलद्रूप झाली. औरंगजेब बादशाहाने दिल्लीहून मुद्दाम नजराणा पाठवून चक्रध्वजाचा सन्मान केला आणि हळूच मांडलिकत्वाची सूचना केली. चक्रध्वजाने या प्रसंगी बाणेदारपणे वागून या लाचार जिण्याला स्पष्ट नकार दिला. एवढेच नाही तर त्याने मोगलांवर स्वारी करण्याचा निश्चय केला. जनतेला हवा होता तसा राजा मिळाला. हाच राजा आपली आकांक्षा पूर्ण करील असा भरवसा दिसू लागला; पण भावना आणि कृती यातील अंतर ओळखणारा अनुभवी पंतप्रधान अतन बड़गोहिन याने सबुरीचा सल्ला दिला. तो म्हणाला –

“ महाराज, मीही अहमिया आहे. आपल्या प्रिय मातृभूमीवर आज परक्यांची उन्मत्त पावलं थैमान घालीत आहेत. कोणीही स्वाभिमानी अहमिया हे सहन करू शकणार नाही. हे मलाही पटत. पण नुकत्याच झालेल्या युद्धानं आपलं सैन्य, आपला खजिना, आपली कोठारं, सर्वांचं नुकसान झालं आहे. ते आधी भरून काढलं पाहिजे. नव्या उमेदीचा सेनानी शोधून त्याच्याकडे ती जबाबदारी सोपविली पाहिजे. ”

चक्रध्वजाला हा सल्ला मानवला. दरबारातल्या मुत्सद्द्यांनी एकत्र येऊन विचार केला. किल्ल्यांची डागडुजी, धान्य व शस्त्रे यांची जमवाजमव आणि सैन्यभरतीची तयारी अशा विविध योजना निरनिराळ्या मंत्र्यांच्याकडे सोपविण्यात आल्या. मोहिमेची तयारी ठराविक मुदतीत पूर्ण करायची असेही ठरले –

यानंतर पंतप्रधान अतन बड़गोहिन आणि राजा चक्रध्वज यांनी नवा उमदा सेनानी शोधण्यास सुरुवात केली. अतन प्रधानाच्या नजरेसमोर एक तरुण होता. राजाला त्याने त्याचे नाव सांगितले. राजालाही मनातून ते पटले होते; पण अजून निर्णय घेतला गेला नव्हता. सूक्ष्मपणे लक्ष ठेवून त्याचे गुण पाहिले जात होते –

एकदा राजा चक्रध्वज शिकारीसाठी बाहेर पडला. अनेकांच्या बरोबर तो तरुणही राजाबरोबर होता. एके ठिकाणी राजाने आपला घोडा त्या तरुणाजवळ आणून मोगल फौजांच्या आणि त्यांच्या सेनानींच्याविषयी बोलणे काढले. बोलता बोलता राजा चक्रध्वज म्हणाला –

" गौहत्तीकडे नजर गेली की मन उदास होते. जी आमची एके काळी राजधानी होती, तेथे आज मोगल सेनानींचे रंगविलास चाललेले पाहिले की तळपायाची आग मस्तकात जाते. या सैय्यद फिरोजच्या आणि सैय्यद शानाच्या मुसक्या बांधून आमच्यासमोर आणणारा कोणी सेनानी अहमिया सेनेत आहे की नाही ? "

" महाराज, असे अनेक वीर अहमिया आहेत ! आपण आशीर्वादाचा हात कोणत्याही डोक्यावर ठेवलात तरी तुम्हाला सेनानी लाभेल. " त्या तरुणाने विनयाने पण ठामपणे सांगितले.

राजा चक्रध्वज खूष झाला. सेनापती होण्याची लोभी भावना या तरुणाची नाही; पण जाज्वल्य स्वाभिमान, स्वतःच्या देशबांधवांविषयी

विश्वास आणि त्याचा स्वतःच्या पराक्रमाबद्दलचा आत्मविश्वास जबर आहे, हे राजाने ओळखले. अतनची निवड योग्यच होती हे त्याला कळून चुकले. त्यानंतर भरलेल्या मुत्सद्यांच्या सभेत राजाने मोहिमेची सूत्रे नव्या सेनानीकडे देण्यासंबंधी घोषणा केली. हा नवा सेनानी होता तरुण, उमदा, तेजवी लाछित बड़फुकन! सर्वांनी एकमताने निवड मान्य केली.

लाछित बड़फुकन हा लुखुरासन वंशातला होता. जहांगिराच्या कारकीर्दीत मोगलांशी झालेल्या युद्धात, आसामचा सेनापती असलेला, मोमाईतामुली याचा लाछित हा सर्वांत धाकटा मुलगा. वडिलांच्या बरोबर राहून युद्धशास्त्र आणि राज्यशास्त्र यात लाछित तरबेज झाला होता. शिवाय घोडा बरुआ, दुलिया बरुआ, सिमालुगुडिआ फुकन, दोलक्षलिया बरुआ अशा विविध अधिकाराच्या जागांवर त्याने काम केले होते. पुढे तर पंतप्रधान अतन बड़गोहिनचा निजी कारभारी म्हणून काम करण्याची संधी त्याला लाभली. त्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेऊन लाछित राजकारणाच्या खाचाखोचा व डावपेच यांच्यातही तरबेज झाला.

राजा चक्रध्वजाने एक खास दरबार भरवून मोहिमेची सूत्रे सन्मानपूर्वक लाछितच्या स्वाधीन केली. सोन्याची मूठ असलेली आणि जडावाचे काम केलेली एक मूल्यवान समशेर लाछितच्या कमरेला बांधून राजाने त्याचा गौरव केला. सर्वजण लाछितकडे पाहात होते. त्याची ती भरदार मूर्ती पाहून सर्वांना समाधान वाटले. नवा सेनापती झालेला लाछित तरुण आहे या विचाराने जनताही खूष झाली. सर्वांच्या अंतःकरणात नवी उमेद निर्माण झाली. आसामच्या स्वातंत्र्याचा दिवस आता लांब नाही; असा विश्वास निर्माण झाला.

लाछितने वेळ न दवडता तयारी सुरू केली. आपल्या राजाने व जनतेनें आपल्यावर टाकलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी तो अहोरात्र कष्ट करू लागला. आजूबाजूच्या राजांशी संधान बांधून त्यांच्याकडून मदतीचे आश्वासन मिळविण्याचा प्रयत्न त्याने अतन प्रधानाकडे सोपविला. त्याप्रमाणे कुचबिहार, जयंतिया आणि काचारच्या राजांकडून साहाय्याचे आश्वासन मिळाले. प्रत्यक्ष आपल्या प्रदेशात त्याने गढया व तटबंदी बांधून घेतली. किल्ले लढाऊ बनविले. तो स्वतः घोड्यावरून सर्वत्र फिरून तपासणी करीत असे. सरहद्दीवरच्या बातम्या तातडीने मिळविण्यासाठी त्याने हेरांची साखळी निर्माण केली. होता होता तयारी विशिष्ट मर्यादेला येऊन पोहोचली. गडगावला सैन्य जमा झाले. सैन्याला ध्येय समजले होते.

१६६७ इ. सनाच्या ऑगस्टमध्ये अहमिया सैनिकांनी ब्रह्मपुत्रेतून युद्धनौका गौहत्तीच्या दिशेने हाकारल्या. स्वतः लाछितची देखरेख होती. त्याने कालियाबरनला सैन्याचे दोन विभाग करून शत्रूला कैचीत पकडण्याचा डाव योजला होता. इकडे आपल्याच धुंदीत मग्न असलेल्या सैद फिरोजला याची कल्पनाही नव्हती. युद्धाची पहिली ठिणगी पडली बाहबारीच्या किल्ल्यावर ! बाहबारीचा किल्ला अहामिया सैनिकांनी घेतला. पाठोपाठ कज्जलीच्या किल्ल्यावर हल्ला झाला. बेसावध मोगल सैन्याची दैना उडाली.

लाछितने मणिकर्णेश्वराच्या टेकडीवर शाहबुर्जाजवळ तळ दिला. तेथून गनिमी पद्धतीच्या हल्ल्यांनी तो मोगल सैन्याचे लचके तोडीत होता. सैय्यद फिरोजने आता ही धाड गौहत्तीवरही येईल हे ओळखले आणि इताखुलीहून शाहबुर्जावर हल्ला केला; पण बेमतेला या लढवय्याने तो परतवून लावला. सतत तीन महिने ब्रह्मपुत्रेच्या किनाऱ्यावर अशा

चकमकी चालूच राहिल्या. गनिमी हल्ले, चारी बाजूंनी नाकेबंदी, रसद तोडणे असा सर्व बंदोबस्त राखून लाछितने नोव्हेंबरात पाण्यातून व जमिनीवरून असा दुहेरी हल्ला चढविला. मोगलांचा संपूर्ण पराभव करून आसामी सैन्य इताखुली व गौहत्तीवर चढाई करून गेले. शरण आलेल्या सैय्यद फिरोज, सैय्यद शाना वगैरे सेनानींना कैद करण्यात आले. गौहत्तीवर पुनश्च आसामीयांचे निशाण फडकू लागले.

चक्रध्वजाला ही बातमी समजताच त्याला अत्यानंद झाला. त्याने लाछितला बोलावून त्याचा भर दरबारात बहुमान केला; पण त्या प्रसंगीही लाछितने आपला तोल जाऊ दिला नाही. तो म्हणाला —

" महाराज, आपल्याच आशीर्वादाच्या पुण्याईने आम्ही एवढे करू शकलो; पण मला एक नम्र सूचना करावीशी वाटते की, आपल्या विजयाच्या आनंदात मग्न होण्याची ही वेळ नाही. आसामला गिळंकृत करण्याचे अवरंगजेबाचे अनेक वर्षांचे स्वप्न आहे. तो या बातमीने चिडून अधिकच निकराने चालून येईल. तेव्हा आपण गाफील न राहता, आहे त्याहून अधिक मोठी तयारी केली पाहिजे. आले होते त्यापेक्षा येणारे संकट मोठे असेल. " लाछितच्या दूरदर्शीपणाबद्दल सर्वांनी त्याचे कौतुक केले आणि खरोखरीच आसामी जनता अधिक जोमाने युद्ध-सिद्धता करू लागली.

लातितचे भाकित खरे ठरले. आसामातील उठावाची बातमी पोहोचली तेव्हापासूनच अवरंगजेबाने मोठ्या ताकदीची फौज आसामात पाठविण्याची तयारी सुरू केली होती. फक्त विचार चालला होता सेनानीचा. त्याच वेळी त्याला रामसिंगाची आठवण झाली. शिवाजी पळून गेला तेव्हापासून रामसिंग त्यांच्या डोळ्यात खुपत होता. या हिंदूला त्या हिंदूंच्या विरुद्ध लढायला पाठविण्याचा त्याचा सराईत डाव

मनात पक्का झाला. ही मोगलाई मसलत त्याने सहज पार पाडली. रामसिंगाची योजना सेनानी म्हणून केली; पण तेव्हाच अनेक विश्वासू मोगल सरदार त्याने या स्वारीत रामसिंगाबरोबर पाठविले.

अठरा हजार घोडदळ, तीस हजार पायदळ, पंधरा हजार गोलंदाज, तोफखाना आणि रशीदखान, बहलोलखान, सुलतानअल्ली, मीर बेग असे मातबर सरदार बरोबर घेऊन रामसिंग दिल्लीहून निघाला. हेरांनी ही बातमी ताबडतोब लाछितकडे पोहोचविली. लाछितने ही अपेक्षा केलीच होती.

लाछितने खंदक, मोर्चे आणि तटबंदी यांवर स्वतः लक्ष केंद्रित केले. ब्रह्मपुत्रेत युद्धनौकांचा फिरता पाहरा चालू केला. आसामच्या विशाल प्रदेशाचे निरनिराळे विभाग करून त्यांच्या रक्षणाची जबाबदारी अनेक सेनानींवर सोपविली. शिवाय त्याची स्वतःची फिरती चालूच होती.

गौहत्तीच्या उत्तरकिनाऱ्यावरील अमिनगावला तटबंदी बांधणे आवश्यक आहे असे पाहून तीन महिन्यांपूर्वीच लाछितने तशा सूचना देऊन माणसे नेमली होती. आता फक्त प्रत्येक ठिकाणी जाऊन काम झाले की नाही एवढेच तो पाहात असे. त्यासाठी तो स्वतः रात्रंदिवस फिरत होता. लाछित केव्हा येऊन धडकेल याचा नेम नसल्याने सर्वजण आपले काम चोख व वेळेत पूर्ण करायला बघत. लाछित असाच फिरत अमिनगावला आला. तेथील तटबंदीचे काम अजूनही अपूर्णच आहे असे त्याला दिसले. त्याने आपला घोडा वेगाने प्रत्यक्ष बांधकामावर नेऊन उभा केला.

" कोणाकडे आहे हे काम ? " लाछितने करड्या आवाजात प्रश्न केला. त्यावर कोणीही काही बोलले नाही. लाछितचा राग वाढत गेला.

" आसामचा सेनापती म्हणून मी तुम्हाला विचारतो आहे, बोला. " अखेरीस लाछितने त्यांना बोलावयास भाग पाडण्यासाठी म्हटले.

" पण महाशय, आम्ही आता संपवूच हे काम. आपण रागावू नका. " कोणीतरी भीत भीत म्हणाले.

" माझा प्रश्न तो नाही. हे काम कोणाकडे सोपविले होते? " लाछित.

" आपले मामाच – " बोलणाऱ्याच्या गालावर काडकन् हात पडला. त्याचे पुढचे शब्द बत्तीस दातांत अडकून पडले.

" मामा – कोण कुणाचा मामा? माझी मोठी आई, तिचं शील, स्वातंत्र्य, पावित्र्य धोक्यात असताना; तिची हजारो लेकरं तहानभूक विसरून अहोरात्र कष्ट करीत असताना सेनापतीच्या घरगुती नात्यांचा उच्चार करायला तुम्हाला शरम नाही वाटत? मी इथे लाछित म्हणून आलेलो नाही तर ज्याच्या हाती महाराज चक्रध्वजांनी आसामचा अभिमान सोपविला आहे असा त्यांचा सेनापती म्हणून आलो आहे. " लाछित रागाने लाल झाला होता. त्याने मागे वळून बरोबरच्या अधिकाऱ्याला हाक मारली.

" नियोग, हे काम करण्यात हलगर्जीपणा करण्याच्या गुन्ह्यासाठी इथल्या प्रमुखाला आम्ही वधाची शिक्षा देतो आहोत. या आज्ञेचे पालन ताबडतोब झाले पाहिजे! " एवढे बोलून लाछित पुढे निघून गेला.

या हकीगतीत लाछितची दिसलेली कर्तव्यदक्षतेची जाणीव आणि त्याला कामचुकारांचा असलेला तीव्र तिटकारा सर्वांना समजला तेव्हा त्याचा परिणाम फारच चांगला झाला. सगळीकडे जरब बसली. कामे वेळेत व सुसूत्र होऊ लागली.

रामसिंग सरहद्दीपर्यंत येऊन ठेपल्याच्या बातम्या आल्या. लाछितने आपल्या हेरांकडून रामसिंगाच्या फौजेची माहिती काढली. लाछितने

ताबडतोब निर्णय घेतला की, एवढ्या मोठ्या फौजेशी उघड्यावर लढणे योग्य नाही. त्याने आपले सैन्य दऱ्याखोऱ्यांतून आणून वसवले. आसामी फौजेने माघार घेतली या कल्पनेने रामसिंग शेफारला. अंतर्भागात घुसून तो ब्रह्मपुत्रेतून पुढे हाजोपर्यंत आला.

लाछितचा हेतू सफल झाला. आत आलेल्या मोगलांच्या फौजांवर छुपे हल्ले चढवून त्यांना बेजार करण्याचे तंत्र लाछितने चालू केले. आसामच्या धूमधार पावसाने, दाट अरण्यातील वाटांनी आणि अपघाती हल्ल्यांनी मोगली फौज जर्जर झाली. आता प्रत्यक्ष लढाईला तोंड पाडले नाही तर मोगली सैन्य बेजार होऊन त्यात बेदिली माजेल या विचाराने रामसिंग योजना आखू लागला.

पांडू किल्ल्यावर हल्ला चढवून, त्याने तोफांचा भडिमार करून रंगाली बुरुजाला खिंडार पाडले; पण राणीराजाच्या दक्षतेने ते तात्काळ बुजविले गेले. पुन्हा दिवस फुकट जाऊ लागले – काल्जोर किल्ल्यावरील हल्ला मिरी संदिकैने परतवून लावला. नऊ दिवस तेथे गेले – बाहबारीच्या किल्ल्यावर मोगलांच्या धडका बसल्या; पण उपयोग नाही. उलट मोगलांनीच या लढाईत तोफा व हत्यारे गमावली. शेवटी रामसिंगाने स्वतः आंगियाखुटीला संग्राम मांडला. तेथे त्याला जय मिळाला. काही युद्धनौकाही त्याच्या ताब्यात आल्या; पण निसर्ग कोपला. भरमाप पाऊस कोसळू लागला. नद्यांना प्रलयकारी पूर आले. हालचाली अशक्य झाल्या – पुन्हा दिवस फुकट चालले.

रामसिंगाची फौज स्वस्थ बसून होती. सहा-आठ महिने घरापासून दूर राहिल्यामुळे ती कंटाळली होती. त्यात पाऊस आणि रोगराईने कहर मांडला होता. या स्वस्थतेच्या काळात रामसिंगाने फितुरी करण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्याला यश आले नाही.

लाछित बड़फुकन अजूनही पहिल्याच तत्परतेने इकडून तिकडे जात येत होता. त्यानेही सतत अनेक महिने श्रम केले होते. मध्यंतरी चक्रध्वजमहाराजांचा मृत्यू झाला होता. आसामी जनतेचे आणि लाछितचे स्फूर्तिस्थान काळाने त्यांच्यापासून हिरावून नेले होते. या मानसिक आघाताने आणि शारीरिक कष्टाने लाछित थकला. त्याच वेळी पावसाळ्यातील वातावरणाचाही त्याच्यावर परिणाम झाला. तो ज्वराने आजारी पडला. इताखुलीच्या किल्ल्यात तो पडून होता.

रामसिंगाने पावसाचा जोर थोडा कमी झाल्यावर हल्ल्याच्या योजना आखल्या होत्या. तशी संधी त्याला मिळाली. त्यातच बड़फुकनच्या आजाराची वार्ताही येऊन थडकली. मग अतिशय निकराने आणि सर्व सामर्थ्यानिशी रामसिंगाने चढाई केली.

ब्रह्मपुत्रेतून त्याने आपल्या नौका चढाईसाठी लोटल्या. आसामी नौकांचा धीर सुटला व त्या प्रतिकार करण्याऐवजी परतू लागल्या. लाछितला इताखुलीच्या किल्ल्यात ही बातमी समजली. तेव्हा आजाराची पर्वा न करता तो जातीने या युद्धात पडला. लाछित आला आहे हे समजताच आसामियांच्या नौका उलटल्या. त्यांनी प्रतिकाराला आरंभ केला. योजनाबद्ध हालचाली करीत लाछितच्या नेतृत्वाखाली त्यांनी असामान्य पराक्रम केला. कामाक्षी – इताखुली – अश्वक्रांताच्या त्रिकोणात चाललेली ही नौकांची लढाई मोगलांच्या हातून गेली. विजयाचे पारडे आसामियांच्या बाजूला झुकले. माघार घेणाऱ्या मोगलांचा पांडूपर्यंत आसामियांनी पाठलाग केला. अखेरीस रामसिंगाने, '–आम्ही जातो आहोत. निदान सुखाने घरी परत जाऊ द्या–' असा विनंतीचा निरोप पाठविला.

लाछितने मोठ्या औदार्याने हे मान्य केले. लढाई संपली होती.

आसाम स्वतंत्र झाला होता. विजयाचा आनंद अहमियांनी अनुभवला होता. येथवर शरीरात आणि मनात प्राण गोळा करून लाछितने जीवनाची यशस्वी वाटचाल केली; पण ज्वर, जखमा आणि श्रम यांनी तो पुरता खचला. अहमियांचा लाडका लाछित परतीच्या प्रवासात त्यांना सोडून देवाघरी गेला.

◆ ◆ ◆

# ५. “ पांचालंकुरिच्चीचा पाण्डिय ”



**वीर कट्टबोम्मन**

जरतारी किनारीचा आणि लाल मखमलीचा पोशाख घातलेला ॲलन दरबारात प्रवेश करण्यासाठी प्रवेशद्वाराजवळ थांबला होता. आतून परवानगी घेऊन आलेल्या रक्षकाने ‘ चलावं ’ असे हाताच्या खुणेने सुचविले. ॲलन आत निघाला. बरोबर त्याचे दोन सहकारी होते.

दरबारात पाऊल टाकताना, डावा हात कमरेला लटकणाऱ्या लांब तलवारीवर ठेवलेला आणि उजव्या हातात डोक्यावरची पिसांची टोपी घेतलेला ॲलन तालबद्ध पावले टाकीत राजासमोर येऊन उभा राहिला. त्याने लवून अभिवादन केले. त्याच्या सहकाऱ्यांनीही त्याचे अनुकरण केले.

" बसा " राजाने म्हटले.

" थॅंक् यू " ॲलन म्हणाला, " आम्ही आपल्याला कंपनीसरकारचा हुकूम सांगायला आलो आहोत. "

" हुकूम ! " राजाच्या शब्दांतून राग ओसंडत होता, " मिस्टर ॲलन, आपण निरोप म्हणायला हवं होतंत. "

" राजेसाहेब, आपल्या राज्याभोवतीच्या सर्व राजांनी कंपनीच्या समोर संपूर्ण शरणागती पत्करली आहे. आपण वेळीच सावध होऊन कंपनीची सत्ता मान्य करावी असं मी आपल्याला सुचवतो. " ॲलन म्हणाला.

" ते शक्य नाही. संबंध काय तुमचा? आम्ही कंपनीला ओळखतो ते एक व्यापाराकरता आलेली कंपनी म्हणून. सत्ता कोणी दिली या उपटसुंभांना? आम्ही स्वतंत्र आहो आणि स्वतंत्रच राहू. फिरून सांगतो दोस्तीच्या आणि बरोबरीच्या नात्यानं आपण संबंध ठेवाल तरच ठीक नाहीपेक्षा त्याचे परिणाम वाईट होतील ! " राजाकडून असे बाणेदार उत्तर मिळाले. तेव्हा अधिक वेळ न दवडता ॲलन आणि त्याचे सहकारी दरबारातून बाहेर पडले –

* * *

त्या वेळी दक्षिण भारताचे अधिपती होते अर्काटचे नबाब ! तामिळनाडमधील छोट्या छोट्या राजांनी आणि सरदारांनी नबाबाला कर देण्याची अनेक वर्षांची प्रथा होती; पण गादीवर आलेला नबाब दुबळा असल्याने कोणीच वेळेला कर देईनात. व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीला ही पर्वणीच वाटली. कंपनीने नबाबाला मोठमोठ्या रकमा कर्जाऊ देऊन त्याच्या बदल्यात करवसुलीचे हक्क

मिळविले. अनेक सरदारांकडून कंपनीने कर वसूल केला. जेथे विरोध झाला तेथे आपल्या कवायती फौजा पाठवून जबरदस्तीने कर वसूल केला. हळूहळू सर्व तामिळनाडचा कारभार आपल्याकडे घेण्याचा कंपनीचा डाव होता. त्यात त्यांना यशही येत गेले. व्यापार बाजूला राहिला आणि राज्यकारभार व पैसा यांच्या हव्यासाने कंपनी सर्वाधिकार प्रस्थापित करण्याच्या उद्योगाला लागली. दुर्बल राजे आणि सरदार कंपनीला खूष करून आपली राज्ये सुरक्षित ठेवण्याची खटपट करू लागले; पण पहिल्यापासून कंपनीच्या या कृष्णकारस्थानाला पाण्डिय कट्टबोम्मनने विरोधच केला. त्याने कधीही कंपनीच्या वर्चस्वाला मान्यता दिली नाही –

इ. स. १७९० मध्ये, वयाच्या तिसाव्या वर्षी, कट्टबोम्मन राजा झाला. प्रजाहितदक्ष, नीतिमान आणि न्यायी राजा म्हणून त्याने आपल्या राज्यातील लोकांचे प्रेम संपादन केले होते. शिवाय तो पराक्रमी, शूर आणि स्वाभिमानी होता. पांचालंकुरिच्चीचा किल्ला त्याने आपल्या देखरेखीखाली बांधून घेतला होता. त्याला इंग्रज कंपनीने तामिळनाडच्या राजकारणात चालविलेली लुडबुड साफ नामंजूर होती. त्याने स्वतः तर कधी कंपनीचे वर्चस्व मान्य केले नाहीच; पण आपल्या मित्रांना तो वारंवार सांगायचा,

" मित्रांनो, आपल्या मातृभूमीत मानानं जगण्याचा आपला हक्क या उपटसुंभ गोऱ्यांना विकू नका. आकाशातून पडणाऱ्या अमृतधारांनी आमच्या धरणीमातेच्या उदरात जे पिकतं त्यावर आम्हा सुपुत्रांचा खरा हक्क आहे. मग या परकीयांची जबरदस्ती आम्हीं का सहन करायची ? आपण स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगू या. " अशा तऱ्हेच्या त्याच्या विचारांना वास्तविक फार मोठी साथ मिळायला हवी होती; पण दुर्दैवाने त्याची

ही भाषा आजूबाजूच्या स्वाभिमानशून्य राजांना समजली नाही. या राजांप्रमाणेच कट्टबोम्मनलाही नमवू असे मानून कंपनी वारंवार पत्रे पाठवू लागली. या पत्रातून मागण्या आणि धमक्या याखेरीज काहीच नसे. त्यांची विल्हेवाट लावण्याची कट्टबोम्मनचीही निश्चित तऱ्हा होती. तो कधी त्या पत्रांना उत्तरेच लिहीत नसे. अखेरीस कंपनीने ॲलन नावाचा आपला वकील कट्टबोम्मनकडे पाठविला; पण त्याचाही उपयोग झाला नाहीच –

* * *

ईस्ट इंडिया कंपनीचा वकील ॲलन परत गेला आणि त्याने सर्व हकीगत कंपनीच्या मुख्य ठाण्यावर म्हणजे मद्रासला जाऊन निवेदन केली. आता कट्टबोम्मन हा सरळ सांगून ऐकणार नाही हे कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळून चुकले. त्याचबरोबर कट्टबोम्मनला ताबडतोब वठणीवर आणले नाही तर त्याची ही उद्दामवृत्ती शेजारच्या राज्यातही पसरण्याचा धोका दिसू लागला.

कंपनीने तिरुनेलवल्ली येथे जॅक्सन हा नवा कलेक्टर नेमला. जॅक्सन तिरुनेलवल्लीला आला. या नव्या कलेक्टरची तत्परतेने भेट घेऊन अनेक दुर्बल राजांनी आपली निष्ठा व्यक्त केली. त्यापैकी काहींनी जॅक्सनला कट्टबोम्मनबद्दल अनेक तक्रारी सांगून त्याचा राग वाढविला. जॅक्सनने कट्टबोम्मनला पत्र पाठवून ताबडतोब भेटण्याचा आदेश दिला. दुसरे-तिसरे-चौथे अनेक पत्रे पाठवूनही कट्टबोम्मन येईना तेव्हा एका खास दूताबरोबर निरोप गेला. कट्टबोम्मन इतके दिवस विचार करीत होता. अखेर आपल्या सल्लागारांशी विचारविनिमय करून त्याने भेटीला जावयाचे ठरविले.

कट्टबोम्मनने आपला भाऊ व काही निवडक धाडसी लोकांना बरोबर घेतले व तो तिरुनेलवेल्लीला निघाला. ही बातमी जॅक्सनला समजली. त्याचे खुनशी मन यामुळे आनंदित झाले. कट्टबोम्मनला होईल तेवढे डिवचून, चिडवून त्याला अपमानित करावयाचे असे जॅक्सनने ठरविले. जॅक्सन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सारखा फिरू लागला. कट्टबोम्मन इतक्या दुरून त्याच्या भेटीसाठी आला होता; पण जॅक्सनच्या फिरतीमुळे भेट न होता त्याला उगीचच दहा गावे भटकावी लागली. तो मनातून चिडला होता; पण भेट घ्यायचीच असे ठरवून तो जॅक्सन-मागे फिरत राहिला. अखेरीस रामनाथपुरमला भेट घ्यावी असे जॅक्सनने ठरवले. या भेटीच्या वेळी शक्यतोवर कट्टबोम्मनला अधिक चिडवून, नंतर त्याच्यावर गैरवर्तनाचा आरोप ठेवून, त्याला अटक करायची असे जॅक्सनने ठरविले.

रामनाथपुरमला भेट होणार हे समजताच कट्टबोम्मनने आपले हेर पाठवून बातमी काढली. जॅक्सनचा डाव त्याला समजला; पण यावर न घाबरता त्याने भेट घ्यायचीच असे ठरविले. तो स्वतः शस्त्रसज्ज झाला. जॅक्सनच्या बंगल्याभोवती व जमेल तेवढे आतही त्याने आपले लोक गुप्तपणे पेरून ठेवले. इकडे जॅक्सननेही तशीच तयारी केली होती. भेटीची वेळ ठरली होती त्या वेळी कट्टबोम्मन जॅक्सनच्या बंगल्यामध्ये बिनधोक शिरला. जॅक्सन आपल्या कचेरीत होता तिकडे कट्टबोम्मनला नेण्यात आले.

कट्टबोम्मन कचेरीकडे जात होता; पण त्याचे लक्ष बाहेर जाण्याचे मार्ग शोधण्यात होते. आपले गुप्तपणे आत शिरलेले लोक कुठे आहेत हे पाहत तो धीमेपणाने चालत होता. कट्टबोम्मन जॅक्सनसमोर जाऊन उभा राहिला. तेव्हा जॅक्सनने कट्टबोम्मनला बसविण्याचा साधा शिष्टाचारही

पाळला नाही. त्याने केवळ कट्टबोम्मनविरुद्ध अनेक आरोपांचा पाढा वाचायला सुरवात केली. जॅक्सनच्या बोलण्यात सरळपणा, सामोपचार नव्हता. शेवटी तर त्याने प्रत्यक्ष कट्टबोम्मनबद्दल काही अनुदार उद्‌गार काढून धमकीची भाषा सुरू केली. कट्टबोम्मन आतापर्यंत शांत होता. वैयक्तिक नालस्तीची भाषा सुरू झाली तेव्हा त्यानेही मोजक्या शब्दात जॅक्सनला जाणीव दिली. अखेर तो म्हणाला,

" मि. जॅक्सन, तुझ्या आतापर्यंतच्या वागण्यात आणि बोलण्यात रानटीपणाच भरलेला आहे; पण मी दुर्लक्ष केले. तू एक फडतूस नोकर आहेस. एका स्वतंत्र राजाला आपण बोलतो आहोत याचेही भान तुला राहिलेले नाही. तुझी भाषा आणि बोलण्या-वागण्याची पद्धत सुधारली नाहीस तर जीभ मुळासकट उपटून काढली जाईल ! "

" कट्टबोम्मन, तुझ्या उद्दाम आणि मग्रूर वागण्याची कंपनीनं आजवर गय केली; पण प्रत्यक्ष कलेक्टरला दम देण्यापर्यंत पाळी आली असेल तर तुलाही धडा शिकवला जाईल ! " जॅक्सन म्हणाला.

" हं: ! मग पाहूच या तर कोण कोणाला धडा शिकवतो ते ! "

" चार दिवसात सगळी थकबाकी भरून, तू दिलगिरीचं पत्र दिलं नाहीस तर तुझ्यासकट तुझ्या राज्याची विल्हेवाट लावली जाईल ! " जॅक्सनने आपला आवाज चढविला होता.

कट्टबोम्मनला हे सारे असह्य होत होते. त्याने एकदा जॅक्सनकडे तुच्छतेने पाहिले आणि आपल्या तलवारीच्या मुठीवर जोराने हात आपटला.

" जॅक्सन, आपली भेट इथे संपली. बोललेला शब्द खरा करून दाखविण्याची जबाबदारी पाळण्यासाठी तुला आता मी मोकळा सोडतो

आहे; पण आपली भेट पुन्हा झाली तर त्या वेळी मात्र हत्यार उपसूनच मी तुझं स्वागत करीन. जातो मी.'' कट्टबोम्मन बाहेर जाण्यासाठी वळला. तेवढ्यात जॅक्सनने टाळी वाजविली. चारी बाजूंनी त्याचे सैनिक पुढे आले. त्यांनी दारे रोखली. कट्टबोम्मन सावध होताच. त्याने चटकन् हत्यार उपसून घाव घालीत दोन-चार सैनिक आडवे केले. मोकळ्या पडलेल्या दारातून तीरासारखा वेगाने तो बाहेर पडला. पुढे त्याचे गुप्तपणे आत घुसलेले लोक त्याला मिळाले. सर्वांनी मिळून जॅक्सनचे अनेक लोक मारले. कट्टबोम्मन तिथून सुरक्षित बाहेर पडला. एक छोटीशी लढाईच होती ती; पण कट्टबोम्मन प्रत्यक्ष गुहेत शिरून वाघाची शिकार करावी, तशा धाडसाने जॅक्सनची भेट घेऊन आला होता.

जॅक्सनने कट्टबोम्मनबद्दल बरीच खरीखोटी माहिती मद्रासच्या मुख्य ठाण्याला कळविली. कट्टबोम्मनही स्वस्थ बसला नव्हता. त्याने आपल्या एका इंग्रज मित्राकडून कंपनीला सर्व खरी हकीगत कळविली. कंपनीने चौकशी केल्यावर जॅक्सनमुळेच हा प्रसंग घडला अशीच माहिती पुढे आली. जॅक्सनची बदली झाली. नवा कलेक्टर म्हणून लॅशिंग्टनने सूत्रे हाती घेतली.

लॅशिंग्टन काही फारसा वेगळा नव्हता. त्याने कंपनीला सल्ला दिला की रामनाथपुरमचे राज्य खालसा करावे. त्याप्रमाणे कंपनीने केले. यामुळे रामनाथपुरमच्या प्रजेने चिडून जाऊन इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. या उठावात इतरही अनेक संस्थानिक सामील झाले. या सर्व हकीगती मद्रासला कळविण्यात आल्या. त्यातच लॅशिंग्टनने 'या सर्व परिस्थितीला आतून कट्टबोम्मन जबाबदार असावा' असा शेरा मारून कंपनीला परिस्थितीचे गांभीर्य कळविले.

कंपनीने सर्व गोष्टींचा योग्य अर्थ लावून बॅनरमन नावाच्या सेनानीला सर्वाधिकार देऊन कट्टबोम्मनवर पाठविले. बॅनरमनबरोबर सुसज्ज, शिकून तयार केलेले सैन्य आणि काही तोफाही दिलेल्या होत्या. त्याने पाल्यंकोट्टै येथे तळ दिला. तेथून त्याने कट्टबोम्मनला निरोप पाठविला आणि भेटीला बोलाविले. कट्टबोमन स्वतः गेला नाही. त्याने आपला वकील पाठवला. बॅनरमनने त्याला कैद केले.

पांचालंकुरिच्चीच्या किल्ल्यात या वेळी कट्टबोम्मन तसा एकाकीच होता; कारण त्याचा भाऊ आणि बरेच सहकारी तिरुचेण्डूरच्या कुल-दैवताच्या उत्सवासाठी म्हणून तिकडे गेले होते. बॅनरमनने ही वेळ हल्ला करण्यास योग्य आहे असे पाहून आपल्या सैन्याला आदेश दिला. इ. स. १७९९ त सप्टेंबरच्या सुमारास इंग्रजांनी पांचालंकुरिच्चीच्या किल्ल्याला वेढा दिला. कट्टबोम्मनच्या हेरांनी ही बातमी आणलीच होती. त्यामुळे कट्टबोम्मनने सांकेतिक खुणेचा नगारा वाजवून किल्ल्या-बाहेर पडलेल्या आपल्या लोकांना कल्पना दिली. काही सैनिक परतले. काहींना परतता आले नाही. कट्टबोम्मनचा भाऊ मात्र काही लोक घेऊन गडात गुप्तपणे येऊन पोहोचला.

लढाईला तोंड लागण्यापूर्वी बॅनरमनने कट्टबोम्मनला शरणागती पत्करण्यासाठी अर्ध्या तासाची मुदत दिली होती. त्या वेळेचा उपयोग शरणागतीचा विचार करण्यासाठी नाही, तर युद्धाच्या तयारीसाठी करून कट्टबोम्मनने बॅनरमनला उत्तर दिले. बॅनरमनने तोफा डागून किल्ला उध्वस्त केला. इंग्रजांचे सैनिक आत घुसू लागले. हातघाईची लढाई सुरू झाली.

इंग्रज सैन्याची पहिली धडक परतवून लावण्याचे अचाट कृत्य वेळ्ळय तेवन याने केले. त्याला इंग्रजांनी पकडण्यापूर्वी त्याने ऐंशी

शत्रुसैनिक यमसदनास पाठविले. इंग्रजांशी कट्टबोम्मनच्या सैन्याने चार तास झुंज दिली. अखेर दारूगोळा संपला आणि अंधार पडू लागला म्हणून बॅनरमनला लढाई त्या दिवसापुरती बंद करावी लागली. त्याने पालयंकोट्टैहून कुमक मागविली होती. ती येण्याची वाट पाहाणे हाही एक डाव बॅनरमनने लढाई बंद करण्यामागे होताच. कट्टबोम्मनने हा डाव ओळखला होता. यावर किल्ल्यातून निघून जाणे हाच एक मार्ग होता. कट्टबोम्मनने तसा निर्णय घेतला आणि काही निवडक लोक बरोबर घेऊन तो निसटला—

कट्टबोम्मनला इंग्रजांपेक्षा फितुर संस्थानिकांचा जबर राग आला होता. त्याने या संस्थानिकांच्या रागाने त्यांच्यावर अकस्मात छापे घालून त्यांचे खजिने लुटण्यास आरंभ केला. बॅनरमनने नंतर किल्ला तर घेतलाच; पण कट्टबोम्मनवरचा सूड म्हणून त्याने तो किल्ला पूर्णपणे नष्ट केला. इकडे फितुर राजांशी गनिमी काव्याने लढत असताना कट्टबोम्मनने स्वातंत्र्यप्रेमी राजांशी संधान बांधून पुन्हा एकदा एकीच्या बळावर इंग्रजांशी मुकाबला करण्याचा डाव मांडला होता; पण त्याला यावे तसे यश आले नाही. इंग्रजांच्या दहशतीने घाबरलेले राजे उघडपणे स्वातंत्र्याच्या प्रयत्नात सामील झाले नाहीत.

कट्टबोम्मन पुदुकोट्टै विभागात जंगलाजंगलातून फिरत होता. त्याला पकडण्यासाठी मागावर असलेल्या इंग्रज सैन्याला हुलकावण्या देत होता. साधेल तेव्हा आणि साधेल तिथे जनतेला तामिळनाडच्या स्वातंत्र्य-लढयात ओढण्याचा प्रयत्न तो करीत होता.

अखेरीस कंपनी सरकारने निर्वाणीचे अस्त्र वापरले. कट्टबोम्मनला पकडून देणारास मोठे बक्षीस जाहीर केले. कट्टबोम्मन अधिकच सावधगिरी बाळगून राहू लागला. पुदुकोट्टैचा राजा त्याचा मित्र होता.

म्हणूनच त्या राज्याच्या हद्दीतल्या जंगलात तो आश्रयाला आला होता. राजानेही आपली माणसे पाठवून त्याचा शोध घेतला. मोठ्या अगत्याने गुप्तपणे त्याने कट्टबोम्मनला राजवाड्यात आश्रय घेण्याचे निमंत्रण दिले. कट्टबोम्मनने पूर्वीच्या मैत्रीवर विसंबून ते निमंत्रण स्वीकारले. अनेक दिवसांच्या भ्रमंतीनंतर थोडे दिवस सुखाने राहता येईल म्हणून तो सरळ मनाने त्या राजाकडे गेला. पण–

भारताला कोणी तरी दिलेल्या त्या भयंकर शापाने घात केला पुदुकोट्टैच्या राजाने इंग्रजांशी संगनमत करून फितुरी केली. आपल्याच मातृभूमीचा एक सुपुत्र तिच्या स्वतंत्रतेसाठी प्रयत्नशील असताना, केवळ स्वार्थापायी त्याने त्याला दगा दिला. कट्टबोम्मन गाढ निद्रेत असताना इंग्रज सैनिकांकडून धरला गेला. नऊ वर्षांची कर्तबगारी विश्वासघाताने मातीमोल झाली. इ. स. १७९९ मध्ये हे घडले.

कट्टबोम्मनला फाशीची सजा फर्मावण्यात आली. जाहीरपणे एका मोकळ्या मैदानातील झाडापाशी ही शिक्षा अमलात आणली जावी असाही आदेश देण्यात आला.

कट्टबोम्मन धैर्याने त्या झाडापाशी गेला. त्याच्या हालचालीत, त्याच्या चेहऱ्यावर, त्याच्या दृष्टीत कोठेही भीतीचा लवलेश नव्हता. त्याच्या मनात पश्चात्तापाची भावना नव्हती. त्या झाडाजवळ गेल्यावर त्याने आपल्या हाताने फासाची दोरी गळ्यात अडकवून घेतली – पुन्हा काढली – एकवार सभोवार पाहून तो म्हणाला,

" माझ्या प्रिय देशबांधवांनो, मी अगदी सुखाने मरणार आहे. केल्या कृत्यांचा पश्चात्ताप मला होत नाही. या वेळी मला दुःख होते आहे ते एकाच गोष्टीचे की मी लढता लढता मेलो असतो तर माझ्या ध्येयाचे,

निष्ठेचे, प्रयत्नांचे चीज झाले असते; पण दुर्दैवाने माझ्याच एका मित्राच्या विश्वासघाती वागण्याने हे निर्जीव मरण मला मरावे लागते आहे. तामिळनाडची जनता स्वातंत्र्यप्रेमी आहे, हें दाखविण्याची पराकाष्ठा मी केली, त्यासाठी मी मरतो आहे एवढाच आनंद मला वाटतो. ” एवढे बोलून त्याने फासाची दोरी गळ्यात अडकवली व पायाखालचे आसन लाथेने उडवून तो फासाच्या दोरीला लटकून हसतमुखाने परलोकी गेला.

◆ ◆ ◆

संग्रहालय
अनुक्रम
3393
वाचनालय शाखा

# ६. कित्तूरची राणी



**राणी चन्नम्मा**

बेळगावच्या जवळच असलेल्या काकती गावातील देसायांची ही सुंदरी म्हणजे मोठेच आश्चर्य होते !

काकतीकर देसाई हा गावातील सर्वांचे प्रेम संपादून होता. त्याची ही नाजूक, सुंदर, धीट आणि गुणी मुलगीसुद्धा सर्वांची अत्यंत आवडती होती. धुळाप्पा देसाई आणि पद्मावती ही मातापितरे तर सुंदरीवर अपार माया करीत असत. इं. स. १७७८ त सुंदरीचा जन्म झाला. हिचे खरे नाव चन्नम्मा ! पण लहानपणापासूनच तिच्या शारीरिक सौंदर्याने आणि गुणी वागण्याने सर्वजण तिला लाडिकपणे सुंदरी म्हणू लागले. ती मोठी झाल्यावर जाणीवपूर्वक तिला खऱ्या नावाने हाक मारण्याचा प्रयत्न करावा लागला इतके हे तिचे प्रेमाने ठेवलेले नाव सर्वप्रिय झाले होते —

धुळाप्पा देसायाने चन्नम्माच्या शिक्षणाची फार काळजी घेतली. मुद्दाम एका जंगमाची नेमणूक करून त्याने तिच्या लिहिण्या-वाचण्याच्या शिक्षणाची सोय केलीच होती. शिवाय तिच्या उपजत आवडीप्रमाणे त्याने तिला लढाऊ विद्येतही तरबेज केले होते. चन्नम्मा कोणत्याही विषयाच्या शिक्षणामध्ये मनापासून रंगून जाई. प्राचीन ग्रंथांचे वाचन, योगांचा अभ्यास, घोडदौड, पोहणे, भालाफेक अशा विविध विषयांत तिने सारखेच प्राविण्य मिळविले होते. मधेच एखाद्या दिवशी पुरुषवेषात घोड्यावर बसून खूप लांबची दौड करण्याची तिला लहर येई –

त्या दिवशी काही कामासाठी धुळाप्पा देसायाला जवळच्या कुठल्याशा गावी कामासाठी जाऊन लगेच परतायचे होते. त्या वेळी त्याने चन्नम्माच्या हट्टासाठी तिला आपल्याबरोबर घेतले होते. ती दोघे घोड्यावरून काकतीजवळच्या जंगलातून जात होती. त्याच वेळी त्यांना दुरून कित्तूरच्या दिशेने येणारी घोडेस्वारांची एक मोठी टोळी दिसली. आश्चर्याने आणि काहीशा भीतीने घोड्यांचा वेग कमी करीत ती दोघे आडोशाला उभी राहिली. ती मोठी टोळी जवळ आली. त्या टोळीच्या अग्रभागी दौडणारी व्यक्ती धुळाप्याच्या दृष्टिपथात आली आणि तो 'सर्जामहाराज –!' असा उद्‌गार काढून सामोरा जाण्यासाठी पुढे झाला. चन्नम्मानेही आपला घोडा पुढे घेतला व ती मोकळ्यावर आली. त्याच वेळी त्या टोळीचा म्होरक्या तेथे पोहोचला. एकदम, एकाएकी आपल्या वाटेत आलेली ही दोन माणसे कोण?–त्याने सहजपणे तलवारीला हात घातला; पण त्याची तलवार म्यानाबाहेर येण्यापूर्वीच चन्नम्माने आपली तलवार घाव घालण्याच्या तयारीने उंचावली होती.

"सुंदरी, काय हे!" धुळप्पा चपापून ओरडला. त्या आवाजाने त्या स्वाराचे लक्ष वेधले गेले. त्याने धुळाप्पाकडे पाहिले.

" महाराज ! " धुळाप्पाने मुजरा केला.

" कोण – काकतीकर देसाई ! वाः ! चांगला योग म्हणायचा. आता आम्ही आपल्यालाच भेटायला निघालो होतो. " स्वार म्हणाला.

धुळाप्पाने घाईघाईने चन्नम्माजवळ जाऊन तिला हळू आवाजात तो स्वार म्हणजे कित्तूरचे राजे मल्लसर्जमहाराज असल्याचे सांगून मुजरा करण्याविषयी सुचविले. परिस्थिती लक्षात येताच चन्नम्मा लाजेने लाल झाली. तिने चटकन् तलवार म्यान केली. घाईघाईने घोड्यावरून उतरून ती खाली लवली आणि " प्रणाम महाराज ! " असे घाईने म्हणून, मुजरा करून पटकन दूर गेली.

त्या वेळची तिची तारांबळ, चपळाई, लाजेने लाल पडलेला तिचा सुंदर गोरा चेहरा आणि एकूण बांधेसूद आकृती यांचा महाराज मल्लसर्जांच्या मनावर खोल ठसा उमटला. त्यांच्या आणि तिच्या नजरेची भेट झाली आणि मनातले भाव डोळ्यांवाटे सांडतील की काय अशी भीती वाटूनच जणू त्यांनी आपले तोंड फिरवून धुळापा देसायाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहात ' ही कोण ? " म्हणून विचारले.

" माझी मुलगी – चन्नम्मा ! " देसाई म्हणाला.

" अच्छा ! फार छान ! " राजा मल्लसर्ज आता दूर उभ्या राहिलेल्या चन्नम्माकडे धीटपणे पाहात म्हणाला, " काकतीकर, आम्ही एकदम खूष आहोत. " राजाचे ते बोलणे ऐकून धुळाप्पा देसाई काहीसा गोंधळून गेला.

खुलाशाच्या प्रश्नोत्तरांची काही काळ देवघेव झाली आणि चन्नम्मा मल्लसर्ज राजाची नियोजित वधू म्हणूनच काकतीला परतली. धुळाप्पा तर आनंदाने बेहोष झाला. साऱ्या गावात या वार्तेचे स्वागत झाले.

काकतीच्या देसायाची सुंदरी थोड्याच दिवसात कित्तूरचा राजा मल्लसर्जाची राणी चन्नम्मा बनली.

चन्नम्माचे लग्न झाले त्या वेळी ती पंधरा वर्षांची होती. पुढे तेवीस वर्षे तिने सुखाने संसार केला. तिला शिवबसवराज या नावाचा एक पुत्रही होता; पण तो अकाली निधन पावला. मल्लसर्ज राजाची चन्नम्माप्रमाणेच आणखी एक राणी होती. तिचे नाव रुद्रम्मा. सवती असल्या तरी दोघी सख्ख्या बहिणींप्रमाणे नांदल्या. चन्नम्माने आपल्या पुत्राच्या निधनानंतर रुद्रम्माच्या मुलावर प्रेम करून पुत्रसुख मिळविले. शिवलिंग–रुद्रसर्ज हे त्या मुलाचे नाव. रुद्रम्मा ही आपल्या पुत्राला मागे ठेवून देवाघरी गेली; पण चन्नम्माने त्याला आईची उणीव भासू दिली नाही. एवढेच नव्हे तर इ. स. १८१६ मध्ये मल्लसर्ज निधन पावला; त्यापूर्वीच तिने रुद्रसर्जला गादीचा वारसा ठरविण्याचा निर्णय त्याच्याकडून घेवविला होता. साहजिक मल्लसर्ज निधन पावल्यानंतर रुद्रसर्ज गादीवर आला.

रुद्रसर्ज हा अत्यंत चलाख, पराक्रमी आणि धोरणी होता. तो गादीवर आला त्यानंतर थोड्याच दिवसांत म्हणजे इ. स. १८१८ मध्ये पेशवे आणि इंग्रज यांच्यातील कलह पराकोटीला पोहोचला आणि परिणामी इंग्रजांनी पेशव्यांशी लढाई करून त्यांचा पराभव केला. इंग्रजांच्या वाढत्या सामर्थ्याची कल्पना सर्वांना आली. त्या वेळी रुद्र-सर्जाने इंग्रजांचा दक्षिणेतील प्रतिनिधी थॉमस मन्रो याच्याबरोबर मित्रत्वाचा करार केला. या करारान्वये इंग्रजांनी कित्तूर राज्याशी पेशव्यांचे असलेले मैत्रीचे नाते मान्य केले व उलट कित्तूरच्या राजाने इंग्रजांना एक लक्ष पंचाहत्तर हजार रुपये देण्याची अट मान्य केली. यातून कित्तूरची स्वतंत्रता अबाधित राहिली आणि त्या स्वतंत्र परि-

स्थितीचा कित्तूरच्या राज्यकर्त्यांनी पुरेपूर फायदाही घेतला. या वेळी झालेल्या कराराप्रमाणे पैसे इंग्रजांकडे कधीच पोहोचते झाले नाहीत. उलट स्वतःच्या राज्यात रुद्रसर्जाने आपले सेनासामर्थ्य आणि लढाऊ शक्ती वाढविली.

इंग्रजांनी तीनतीनदा कराराची आठवण देऊनही रुद्रसर्जने तिकडे दुर्लक्ष केले. अशी सहा वर्षे गेली. इंग्रजांना खरी परिस्थिती समजली होती आणि ते संधीची वाट पाहात होते. धारवाड शहरात ठाण मांडून बसलेला कंपनीचा अधिकारी थॅकरे हा तर अगदी चित्त्याप्रमाणे झडप घालण्याच्या तयारीत होता—

इ. स. १८२४ च्या सप्टेंबर महिन्यात तशी संधी आली. थॅकरेला बातमी समजली की रुद्रसर्ज हा मृत्युशय्येवर पडला असून कित्तूरमध्ये राणी चन्नम्मा व तिचे कारभारी दत्तविधान पार पाडण्याच्या तयारीत आहेत. राजाच्या आजाराची थॅकरेला केवढी चिंता ! त्याने वैद्यकीय उपचारांच्या मिषाने एका डॉक्टरला कित्तूरला रवाना केले. डॉक्टरने आपले काम चोखपणे पार पाडले. थॅकरेला त्याच्याकडून सर्व हकीगत समजली. निष्कर्ष असा निघाला की, दत्तविधान झाले त्यावेळी राजा मृत किंवा बेशुद्ध असावा; त्याची दत्तपत्रावरची सही संशयातीत नाही; दत्तक घेतलेला मुलगा हा अत्यंत दूरच्या नात्यातला ठरणेसुद्धा कठीण आहे.

थॅकरेसारखा खुनशी अधिकारी इंग्रजांना लाभला हे त्यांचे केवढे भाग्य ! डलहौसीने पुढे वापरलेले संस्थाने खालसा करण्याचे तंत्र या महाभागाच्याच सुपीक मस्तकातून निघाले असावे. दत्तविधानाबद्दलचे सर्व संशय गृहीत धरून थॅकरे पुढील व्यवस्थेसाठी घोड्यावरून तातडीने निघाला. अर्थात त्याने बरोबर चांगले सुसज्ज सैनिक घेतले होतेच—

कित्तूरला ही बातमी पोहोचली त्या वेळी रुद्रसर्ज राजाचे निधन होऊन दोन-चार दिवसच लोटले होते. अजून सुतकाचे विधी पार पडत होते, अशा वेळी थॅकरेने आपला मुक्काम कित्तूरजवळ ठोकला. काळाचे, वेळेचे, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात न घेता थॅकरेने निरोप पाठवून चन्नम्मा व इतर कारभाऱ्यांची भेट मागितली. त्याला नकार मिळाला. त्याने त्या नकाराचा अर्थ लावला तो असा की, कित्तूरमध्ये कारस्थाने शिजत आहेत म्हणून आपल्याला भेट नाकारण्यात आली. त्याने आपल्याच अधिकारात काही माणसे नेमून कित्तूरचा खजिना, राज्यकारभार आणि दत्तकासंबंधीचा निर्णय या बाबतीत कंपनीचा हुकूम येईतो कोणतीही हालचाल होऊ नये असा बंदोबस्त केला. तशा अर्थाचे एक पत्रही त्याने चन्नम्माकडे पाठविले.

चन्नम्मा पुत्रशोकाने व्यथित झाली होती. त्यातच थॅकरेच्या या उर्मट वर्तनाचा आणि सत्तालोलुपतेचा तिच्या मनावर तीव्र आघात झाला. तिने सरळसरळ थॅकरेने नेमलेली माणसे किल्ल्यातून घालवून दिली आणि आपली माणसे नेमून खजिना, किल्ला व कारभार यांचा ताबा स्वतःकडे घेतला. तिने विश्वासू कारभारी एकत्र बोलावून त्यांचा सल्ला घेतला. स्वाभिमान आणि स्वत्व रक्षण करणे हेच उचित असे सर्वांनी ठरविले. थॅकरेचे कुटिल यत्न हाणून पाडले गेले.

थॅकरे कसल्या धुंदीत होता कोण जाणे! त्याने आपले सैनिक कित्तूरच्या किल्ल्याजवळ आणले. तोफा किल्ल्याच्या दारांवर रोखल्या आणि शरणागतीची मागणी केली; पण चन्नम्मा यापूर्वीच तयारी करून बसली होती. तिने बंदुकांच्या फैरी झाडून शरणागतीची मागणी धुडकावून लावली. तिने आपला सेनापती गुरुसिद्दप्पा याला युद्ध करण्याची आज्ञा दिली.

इंग्रजांनी पहिल्याच धडाक्यास किल्ल्याचे दरवाजे उडविले; पण म्हणून चन्नम्मा घाबरली नाही. तिने अधिक निश्चयाने युद्ध करावयाचे ठरविले. तिने आपले सैनिक दोहो बाजूंनी इंग्रजांवर सोडले. गुरुसिद्दप्पाने महाद्वारातून आणि प्रत्यक्ष राणी चन्नम्माने किल्ल्याच्या तटावरून इंग्रज सैन्यावर जबरदस्त मारा सुरू केला; परंतु दरवाजे तोफांनी फोडल्याच्या आनंदाने बेहोष झालेले इंग्रजी सैन्य कॅप्टन ब्लॅक कॅप्टन सेवेल आणि गोलंदाज लेफ्टनंट डायटन यांच्या नेतृत्वाखाली पुढे घुसून दरवाजातून आत जाण्याचा प्रयत्न करू लागले. गुरुसिद्दप्याच्या लोकांनी त्यांना दारातच अडवून प्रखर विरोध केला. हातघाईच्या या लढाईत कित्तूरच्या वीरांनी शर्थ केली. इंग्रज अधिकाऱ्यांपैकी दोघे ठार झाले व एक जखमी होऊन पडला. इंग्रजांचे सैनिक अक्षरशः सर्व कापले गेले. त्यांच्या छावणीत हाहाःकार उडाला. थॅकरेला तर या घटनेने धक्काच बसला. त्या मानसिक आघाताने तो एवढा बेचैन झाला की विचार न करता तो स्वतः उरलेल्या सैन्याची तुकडी घेऊन किल्ल्याच्या रोखाने दौडत आला.

किल्ल्याच्या तटावरून राणी चन्नम्माने ते पाहिले. थॅकरे रागाने बेभान होऊन महाद्वारातून आत आला आणि राणीने त्याच वेळी त्याला नेमका टिपला. गोळी लागून थॅकरे घोड्यावरून खाली आला. चन्नम्माच्या सैन्याला स्फुरण चढले. त्यांनी राहिलेल्या इंग्रज सैन्यावर हल्ला करून त्यांना पिटाळले. या लढाईत इंग्रजांचे अनेक अधिकारी ठार झाले आणि कित्येक गिरफदार केले गेले.

कित्तूरच्या सैनिकांचा पराक्रम, आवेश आणि निश्चय यांचा इंग्रजांना या छोट्या लढाईत अनुभव आला; पण त्याचबरोबर पकडलेल्या इंग्रजांना राणी चन्नम्माने ज्या तऱ्हेने वागविले त्याचेही त्यांना आश्चर्य वाटले.

तत्कालीन इतिहासकारांनी राणीच्या त्या उदार वर्तनाची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. वास्तविक त्या काळच्या प्रथेनुसार या युद्धकैद्यांची विल्हेवाट निराळ्याच प्रकारे लागली असती. छळ, फाशी किंवा हत्तीच्या पायांखाली चिरडून त्या सर्वांना मुक्ती दिली असती तरी ते सार्थच ठरले असते; पण राणी चन्नम्मा उदारधी होती. तिची संस्कृती श्रेष्ठ होती.

इंग्रजांना पराभवानंतर जे दुःख झाले त्याचा परिणाम म्हणूनच की काय त्यांनी जोरदार तयारी सुरू केली. आता केवळ कित्तूरच्या सैन्याचा पराभवच नाही तर राज्यच खालसा करण्याचा विचार ते करू लागले. त्यांनी मुंबई, मद्रास, म्हैसूर अशा सर्व ठिकाणाहून आपली दले कित्तूरच्या लढ्यासाठी एकत्र केली. एका स्त्रीच्या पराभवासाठी एवढी तयारी करावी लागली त्यांना. नोव्हेंबर उजाडला.

इकडे चन्नम्मा राणीही वेळेचा सदुपयोग करीत होती. सैन्यभरती, डागडुजी आणि साठा असे सर्वांगीण कार्य चालू होते. आता द्यावी लागणारी लढत निर्णायक असणार याची सर्वांनाच जाणीव होती. म्हणूनच मारू किंवा मरू अशा निर्धाराने सर्व सिद्धता झाली. राणी चन्नम्मा तर जातीने सर्व बाबतीत लक्ष देत होती. तिला हे करताना मानसिक आणि शारीरिक ताण पडत होता; पण त्याची तिला खंत नव्हती. आपली कार्यपद्धती इतरांना कशी स्फूर्तिप्रद ठरेल हाच विचार रात्रंदिवस काम करताना तिच्या मनात असे. एक स्त्री म्हणून आपली कोणी कीव करावी अशापेक्षा एक स्त्री असून ही एवढे सारे कसे करते अशा तऱ्हेने इतरांना कोडे पडावे म्हणून तिची धडपड चालायची. पण भारतातल्या स्त्रियाही कर्तबगार असतात हे मान्य करतानाच भारतात स्वार्थी, फितुर, मतलबी माणसांची वाण नाही हेही लक्षात

घ्यावे लागते. कित्तूर तरी या नियमाला अपवाद कसे असणार? कित्येक फितूर पकडून राणीने त्यांना हत्तीच्या पायी दिले. इतरांना दहशत बसविण्यासाठी तेही क्रौर्य तिने दाखविले—पण शौर्याच्या परंपरेप्रमाणे भारतात फितुरांचीही परंपरा आहे.

५ डिसेंबर १८२४ हा अत्यंत दुःखाचा दिवस उगवला. निदान कित्तूरच्या इतिहासात तरी तो दिवस अत्यंत दुःखाचा ठरला. कित्येक वीरांचे बलिदान, कित्तूरची स्वतंत्रता, राणी चन्नम्माचा निर्धार सगळे—सगळे मातीमोल झाले. कारण इंग्रजांनी जिंकले—पण कसे? लढून, मारून, पराभूत करून? नाही. त्यांचे यश इतके धवल नव्हते. फितुरीच्या काव्याने त्यांनी कित्तूर जिंकले. या फितुरांनी ऐन लढाईच्या धामधुमीत दारूच्या कोठारातील दारूची भुकटीच निरुपयोगी करून टाकली. दारूगोळा संपलेला, कोठारातील दारूची ही दशा, मग केवळ लढण्याची इच्छा किंवा ईर्षा असून उपयोग काय? राणी चन्नम्मा पतिनिधनाने हताश झाली नाही, पुत्रशोकाने विव्हल झाली नाही. कर्तव्याच्या कठोर व्रतापायी तिने आपली व्यक्तिगत दुःखे मागे टाकली. कित्तूरच्या स्वातंत्र्यवेदीवर आपल्या व्यथा तिने बळी दिल्या; पण—कर्तव्यनिष्ठेचे चीज करणारी माणसेसुद्धा जन्मावी लागतात, लाभावी लागतात. राणीचे दुर्दैव म्हणून ती स्वार्थनिष्ठ माणसांच्या देशात जन्मली आणि तिच्या श्रेष्ठ निष्ठेला पराभूत व्हावे लागले—

कित्तूर पडले. राणी इंग्रजांची कैदी झाली. अखेरीस इ. स. १८२९ मध्ये ही तेजस्वी स्त्री बंदिवासातच मरण पावली.

◆ ◆ ◆

## ७. 'मेरी झाँसी नहीं दूँगी!'



राणी लक्ष्मीबाई

इ. स. १८५१ मध्ये राणी लक्ष्मीबाईस पुत्र झाला. त्या वेळी राजे गंगाधरराव यांना अवर्णनीय आनंद झाला. झांशी संस्थानात उत्साहाला उधाण आले. धडाक्याचे समारंभ ठिकठिकाणी आयोजित करण्यात आले. राजे गंगाधररावांनी अतोनात दानधर्म केला. उतारवयात झालेले अपत्य आणि तोही मुलगा असल्यामुळे हर्षोत्सवाला सीमा राहिली नाही; पण – दैवाला त्यांचे सुख पाहवले नाही. केवळ तीनच महिन्यात तो नवजात पुत्र काळाने हिरावून घेतला. राजा गंगाधरराव आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या दुःखाला पारावार राहिला नाही. त्यांची मनेच खचली.

पुत्राच्या मृत्यूच्या धक्क्याने राजा गंगाधररावांची प्रकृती ढासळली. पुढे दोनच वर्षांनी म्हणजे इ. स. १८५३ मध्ये त्यांना फार त्रास होऊ

लागला. संस्थानचे दिवाण नरसिंहराव आणि राजांचे सासरे मोरोपंत तांबे यांना बोलावून महाराज गंगाधररावांनी दत्तक घेण्याची कल्पना सांगितली. या संदर्भात महाराजांनी नेवाळकर घराण्यातील वासुदेव-रावांचा पुत्र आनंद याचाही उल्लेख केला. महाराजांची एथवर निश्चितता झालेली पाहून मग विलंब लावण्याचे कारण नाही असेच सर्वांना वाटले. तयारीस आरंभ झाला. हिंदुधर्माप्रमाणे होमहवन व समारंभ करण्यात येऊन पाच वर्षांचा आनंद झांशीच्या राजाराणींनी मांडीवर घेतला. या समारंभास प्रमुख दरबारी, नागरिक व झांशीचे पोलीटिकल एजंट मेजर एलिस अशी सर्व मंडळी हजर होती. दत्तविधान पार पडले. आनंद-रावांचे नाव दामोदरराव असे ठेवण्यात आले. पुनश्च एकदा झांशी आनंदसागरात बुडाली.

पण सुख-दुःख, आशा-निराशा यांच्यामध्ये जणू चुरस लागली होती. दत्तविधानानंतर दुसऱ्याच दिवशी महाराज गंगाधररावांनी इहलोकची यात्रा संपवली. राणी लक्ष्मीबाई शोकसागरात बुडून गेल्या. अनेक प्रकारे त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न झाला; परंतु त्यांचे दुःख अनावर झाले होते. शेवटी लहानग्या दामोदराकडे पाहून तरी त्या दुःख आवरतील अशा विचाराने मोरोपंतांनी आपल्या लेकीला पुढील व्यवस्थेचे महत्त्व आणि दामोदराचे मन यांचा विचार करून दुःख आवरण्यास सांगितले. राणी लक्ष्मीबाईंनी यानंतर आपले दुःख आवरले. राज्याची राणी म्हणून असलेली जबाबदारी अधिक महत्त्वाची मानून त्या पुढील उद्योगास लागल्या.

राणी लक्ष्मीबाईंनी पोलीटिकल एजंट मेजर एलिस यांच्याशी विचार-विनिमय करून इंग्रज सरकारकडे अर्ज पाठविला. दत्तक मान्य करून दामोदररावास राज्याभिषेक करण्यात यावा अशा अर्थाचा मजकूर त्या अर्जात होता; पण या वेळी लॉर्ड डलहौसी हा गव्हर्नर जनरल होता.

त्याचे धोरण काहीसे महत्त्वाकांक्षी होते. संधी सापडताच हिंदुस्थानातील संस्थाने खालसा करून ब्रिटिश अंमलाखाली आणावयाची या त्याच्या धोरणानुसार त्याने दत्तक नामंजूर ठरवून एका जाहीरनाम्याने झांशी संस्थान खालसा केले.

मेजर एलिस हा लक्ष्मीबाईकडे आला. त्याने ब्रिटिश सरकारचा निर्णय सांगणारा जाहीरनामा राणीला वाचून दाखविला. अकस्मात् सर्व आशा-आकांक्षांचा चुराडा झाला. राणीच्या मनावर जबर आघात झाला. ब्रिटिशांच्या स्वार्थी, मतलबी आणि विश्वासघातकी मैत्रीचा त्यांना प्रत्यय आला. या वेळी एलिससाहेबाला त्यांनी स्पष्ट शब्दात 'मेरी झाँसी नहीं दूँगी !' असे बाणेदारपणे उत्तर दिले.

पण इंग्रजांनी घेतलेला निर्णय बदलला नाही. राणीला त्यांनी किल्ल्यातील राजवाड्यातून शहरातील राजवाड्यात जाणे भाग पाडले. आपल्या पलटणी आणून किल्ल्याचा कडेकोट बंदोबस्त केला. विलायतेत वकील पाठवून राणीने दाद मागण्याचा प्रयत्न केला; पण तोही निष्फळ झाला. राणी लक्ष्मीबाई आपल्या मुलासह झांशीत एक दीनवाणी विधवा म्हणून आयुष्य कंठू लागली. एके काळी राज्यकारभार करण्याची स्वप्ने पाहणारी लक्ष्मीबाई आता इंग्रज सरकारच्या कृपेवर जगू लागली. दामोदराच्या मुंजीत आवश्यक ती रक्कम तिने मागितली होती; पण इंग्रज सरकारने तीही मागणी नाकारली. पुढे तर संस्थानच्या कर्जाची फेड करण्याचे निमित्त करून तिची पेन्शनही बंद करण्यापर्यंत इंग्रजांची मजल गेली. इ. स. १८५७ पर्यंत अशा अनेक आपत्ती राणी लक्ष्मीबाईंवर आल्या. त्यांच्या मनात क्रोध, करुणा, कर्तव्य आणि अगतिक अवस्था या संमिश्र भावना निर्माण होत होत्या. तरीही अजून त्यांच्या संयमाने कृतीचे लगाम आवळून धरले होते.

इ. स. १८५७ मध्ये याच वेळी हिंदुस्थानात काही ठिकाणी ब्रिटिश सत्तेला विरोध सुरू झाला होता. इंग्रजांच्या फौजेतील हिंदी शिपाईही या उठावात सामील होत होते. दिल्ली व मीरत येथे तर या बंडाने उग्र स्वरूप धारण केले. अमानुष कत्तली, इंग्रजांच्या घरादारांची लूट असे प्रकार ठिकठिकाणी सुरू असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. प्रत्यक्ष झांशीतील फौजेनेही जूनमध्ये बंड पुकारले. शहरातील इंग्रज किल्ल्यात आश्रयाला गेले. राणीने मदतीचा हात पुढे केला; पण इंग्रजांनी तो झिडकारला. त्यांचा आपल्या युद्धनीतीवर विश्वास होता. सामर्थ्याची त्यांना घमेंड होती; पण त्यांच्याच शिपायांनी त्यांची दैना केली. राणीने इंग्रजांचे कपट विसरून त्यांना मदत केली. एवढेच नाही तर आपल्या नोकरांना बंडात सामील होऊ दिले नाही; पण त्यामुळेच बंडवाल्यांनी राणीकडेही खंडणी मागितली. एथवर मजल आल्यानंतर मात्र राणी लक्ष्मीबाईनेही निर्णय घेतला आणि झांशी राज्याची सर्व सूत्रे आपल्याकडे घेतली. योग्य संधीचा योग्य फायदा घेण्यात त्यांनी कमालीचा धोरणीपणा दाखवला.

राणी लक्ष्मीबाई आणि नानासाहेब पेशवे यांचा बालपणापासून स्नेह होता. त्यांचा एकमेकांशी पूर्वीपासून पत्रव्यवहार होताच. त्यामुळे पेशव्यांच्या प्रयत्नाने स्वराज्य स्थापन होणार असेल तर आपण आपल्या परीने मदत केलीच पाहिजे या जाणिवेने त्यांनी बंडात – नव्हे स्वातंत्र्ययुद्धात – सामील होण्याचा निर्णय घेतला. तरीही इंग्रज काय किंवा इतर सधन प्रजाजन काय, कोणावरही अन्याय होणार नाही, त्यांच्या मालमत्तेला धोका पोहोचणार नाही, त्यांच्या कत्तली होणार नाहीत अशा दक्षतेने त्यांनी राज्याचा बंदोबस्त करण्यास आरंभ केला. लहानपणी त्यांनी व्यायाम, शस्त्रांचे शिक्षण, घोड्यावरील स्वारी, राज्यनीती

अशा विषयांचे जे शिक्षण घेतले होते त्याचा त्यांना आता चांगलाच उपयोग होऊ लागला. सर्व राज्यात त्यांनी थोड्याच काळात न्यायदान, करवसुली, शिस्त आणि शांतता याबाबतीत चोख व्यवस्था निर्माण केली. सबंध झांशी प्रांत राणीच्या ताब्यात आला. तिच्या कुशल नेतृत्वावरील लोकांचा विश्वास वाढू लागला.

मध्यंतरी झांशीचे राजे गंगाधररावांचा एक दूरचा नातेवाईक सदाशिव नारायण याने राजेपणाची महत्त्वाकांक्षा बाळगून राणी लक्ष्मीबाईविरुद्ध उठाव केला. करेरा येथील किल्ला ताब्यात घेतला. या प्रसंगी सैन्य, दारुगोळा, शस्त्रे यांच्याकडे राणीने लक्ष केंद्रित केले. सुसज्ज असे सैन्य व दारुगोळ्याचे कारखाने तिने उभे केले. नंतर सदाशिव नारायणावर स्वारी करून त्याला करेराहून पळवून लावले. या तयारीचा उपयोग तिला नत्थेखानाविरुद्ध चांगलाच झाला. एक बाईमाणूस काय लढणार अशा विचाराने झांशी गिळंकृत करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या नत्थेखानाला तिने आपले शौर्य दाखविले. मर्दानी पोषाख घालून राणी स्वतः युद्धात सहभागी झाली. तिने नत्थेखानाचा सरळ सरळ पराभव केला. या लढाईत बुंदेलखंडातील ठाकुरांची निष्ठा व्यक्त झाली. त्यांनी राणीचे नेतृत्व मान्य केले. नत्थेखान हा ओछवाचा दिवाण पराभूत होऊन परतला; पण त्याने त्यामुळे चिडून एक खुनशी डाव टाकला. इंग्रज अधिकाऱ्यांना पत्रे लिहून त्याने त्यांची ' राणी बंडात सामील झाली ' अशी समजूत करून दिली.

इकडे राणी लक्ष्मीबाईंनी अहोरात्र कष्ट करून आपल्या प्रजेचे हित आणि राज्याचा बंदोबस्त या बाबतीत एक उच्च आदर्श निर्माण केला. झांशीची प्रजा सुखी झाली. राणीच्या पराक्रमी नेतृत्वाने सर्व बुंदेलखंडात तिला अनेकांनी आपली पुढारी म्हणून मान्यता दिली. दीन-दुबळ्यांच्या

अन्न-वस्त्र-निवाऱ्याची गरज भागविण्यासाठी तिने केलेल्या कष्टांमुळे सर्व रयत तिच्यावर मनापासून प्रेम करू लागली. सैन्य, शस्त्रे आणि दारूगोळा या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी तिने आरंभिलेल्या प्रयत्नांना झांशीचे पुरुषच नव्हे तर स्त्रियाही हातभार लावू लागल्या. पेशवे आणि इंग्रज अशा दोन्ही पक्षांना चुचकारण्याचे तिचे मुत्सदीपणाचे कृत्य पाहून राजकारणी पुरुषांना अचंबा वाटला. राणीच्या मुत्सद्दीगिरीचे त्यांनी मुक्तकंठाने कौतुक केले. बंडवाल्यांनी ठिकठिकाणी उठाव केला; परंतु अखेरीस त्यांच्यावर पराभव पत्करण्याची पाळी आली. तेव्हां स्वातंत्र्याभिमानींना राणीने सर्व सामर्थ्यानिशी त्यांची साथ करण्याचे ठरविले. इंग्रजांविरुद्ध आता ती उघडपणे उभी राहिली.

या सुमारासच सर ह्यू रोज सैन्यासह झांशीजवळ पोहोचला होता. त्याला झांशी सहज सर करता येईल असे वाटत होते. त्याने राणीकडे दूतावरोबर निरोप पाठविला. 'तुम्ही स्वतः, मोरोपंत, दिवाण, बक्षी वगैरे प्रमुख माणसे निःशस्त्र होऊन आमच्या छावणीत यावे.' परंतु राणीला आता इंग्रजांची नीतिमत्ता माहीत झालेली होती. तिने साफ नकार दिला. आपण दिलेल्या नकाराचे परिणाम तिला स्पष्ट दिसत होते. तिने किल्ल्याच्या तटावरील तोफा पुढे सरकवून इंग्रजांवर रोखल्या. गोलंदाजांची नेमणूक केली. दारूच्या उत्पादनाचा वेग वाढविला. सैन्याला सिद्ध राहण्याची सूचना दिली. सैन्याचे आधिपत्य स्वतःकडे घेतले.

सर ह्यू रोज याने झांशीतील तयारीचा सुगावा लागताच, बाहेरून मोर्चे लावले. अखेरची संधी म्हणून त्याने राणी लक्ष्मीबाईकडे झांशीसकट शरणागतीची मागणी केली व मुदत देऊन तो वाट पाहू लागला. राणी लक्ष्मीबाईने पुनश्च एकदा 'मेरी झाँसी

नहीं दूँगी ! ' असा कडकडीत निरोप पाठविला. निरोप ह्यू रोजकडे पोहोचला –

" धडाड्‌ धुम्‌ ! " इंग्रजांनी तोफ डागली.

" धडड्ड्‌ धुम्‌ ! " राणीने तोफेतून गोळा टाकला.

लढाईला तोंड लागले. झांशीतील स्त्री-पुरुष सर्वजण प्राणपणाने कार्यरत झाले. राणी स्वतः निरनिराळ्या ठिकाणी जाऊन गोलंदाजांना प्रोत्साहन देत होती. ' शत्रू-संहार ', ' नालदार ', ' घनगर्ज ' या तोफा कडाडत आग ओकीत होत्या. विशेष कामगिरी करणाऱ्या सैनिकांना, गोलंदाजांना राणीकडून वेळोवेळी उत्तमोत्तम बक्षिसे मिळत होती. अशा प्रोत्साहनाने त्यांच्याकडून अतुल पराक्रम गाजविला जात होता. इकडे लढाईत असा बिनतोड पराक्रम गाजविला जात असतानाच राणीने मुत्सद्देगिरीचे डाव टाकले. तिने पेशव्यांची कुमक मागविली. पुढून आपण लढा देत असतानाच पिछाडीकडून पेशव्यांच्या फौजा इंग्रजांवर हल्ला करतील आणि या कैचीत इंग्रज-सैन्याची चटणी उडेल असा अत्यंत मार्मिक डाव होता. त्याप्रमाणे तात्या टोपे हा पेशव्यांचा प्रमुख सेनापती प्रचंड फौज घेऊन आलाही; पण फौजेच्या संख्येपेक्षा त्या फौजेचे मनोधैर्य मोठे असावे लागते हा युद्धनीतीतला प्रमुख सिद्धान्त या वेळी कसोटीस लागला. तात्या टोपेजवळ संख्याबलाने सैन्य अधिक होते खरे; पण त्या फौजेचे मनोधैर्य दुर्बल होते. त्यामुळे सर रोज याने चढविलेल्या प्रखर हल्ल्यापुढे टिकाव न लागता ती फौज पराभूत झाली.

इकडे तात्या टोपेच्या आगमनाने उत्साहित झालेली राणीची माणसे शिकस्तीने लढू लागली होती; परंतु तात्याची फौज माघारी पळाली हे पाहताच त्यांचेही धैर्य खचले. इंग्रजांनी आता अधिक त्वेषाने हल्ले चढविण्यास आरंभ केला. त्यांच्याजवळ शक्तिशाली दुर्बिणी होत्या.

त्यांच्या साहाय्याने ते अचूक मारा करीत. पाण्याचा साठा, दारूगोळ्याचा कारखाना, दारूची कोठारे यांवर अचूक गोळे पडून त्यांचा विध्वंस होत होता. तरीही राणीने धैर्याने लढाई चालूच ठेवली. अखेरीस इंग्रजांनी झांशीत प्रवेश मिळविला. शहराचे तट, रस्ते, वाडे, किल्ला अशा टप्प्याटप्प्याने लढाई होत गेली; पण राणीने नेट सोडला नाही. जेव्हा तिला कळून चुकले की, सतरा दिवसांच्या या लढाईने किल्ला, वाडा, सैन्य सारेच कमकुवत झाले आहे तेव्हा तिने झांशी सोडण्याचा विचार पक्का केला.

रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन जावयाचा तिचा निश्चय झाला. मर्दानी पोषाख घालून, एका मोठ्या शेल्याने दामोदरास पाठीशी बांधून, शस्त्रसज्ज राणी लक्ष्मीबाई निवडक सेवकांना बरोबर घेऊन घोड्यावरून निघाली. आडव्या आलेल्या इंग्रज शिपायांना कंठस्नान घालीत तिने फळी फोडून घोडा भरवेगाने बाहेर काढला. ती काल्पीच्या दिशेने दौडत होती. पाठीमागे इंग्रजांची एक टोळी लागलीच होती. एकवीस मैल पाठलाग करूनही इंग्रजांना राणी सापडली नाही. अखंड दौड करून, पाठीवरच्या दामोदराला सांभाळीत राणी लक्ष्मीबाई अखेर काल्पीला पोहोचली.

पेशव्यांनी तिचे यथोचित स्वागत करून तिच्या धैर्याचे कौतुक केले. पुढे तर तिचा सल्ला मान्य करून पेशव्यांनी युद्धाची सूत्रे हालविली. तिच्याच सल्ल्यानुसार काल्पी सोडून त्यांनी ग्वाल्हेरच्या जवळचा मुरारचा किल्ला शिंद्यांकडून जिंकून घेतला; परंतु या यशाने ते एवढे धुंद झाले की, जणू स्वराज्य आले अशा भावनेने ते दरबार, धार्मिकविधी, जलसे यांतच रंगून गेले. राणी लक्ष्मीबाईने त्यांना अजूनही सावध होण्याचा सल्ला दिला; पण त्यांना तो मानवला नाही. ग्वाल्हेरवर

इंग्रजांच्या फौजा प्रत्यक्ष चालून आल्यानंतर त्यांना जाग आली. या वेळीही राणी लक्ष्मीबाई इंग्रजांविरुद्ध अतुल धैर्याने लढली. हल्ल्यामागून येणारे हल्ले परतवीत ती खंबीरपणे आपली जागा धरून राहिली; पण शत्रूचे बळ वाढत गेले. अखेरीस याच लढाईत एके प्रसंगी राणी अंगावर दोन प्रखर घाव पडल्याने रणांगणावर पडली. एक डोक्याच्या उजव्या भागावर तलवारीचा आणि दुसरा छातीत संगिनीचा असे वार तिला लागले. तिच्या विश्वासू सहकाऱ्यांनी तिचा पवित्र देह त्याही परिस्थितीत उचलला. राणी इंग्रजांच्या हाती आताही सापडली नाही.

गवताची एक गंज पेटवून राणीच्या देहाचे सार्थक करण्यात आले. इंग्रज सेनानींनी तिच्या ध्येयनिष्ठेचे, धैर्याचे, शौर्याचे व निश्चयाचे केलेले कौतुक त्यांच्याच शब्दांत वाचावयास मिळते.

◆ ◆ ◆

## ८. 'ऐंशी वर्षांचा बिहारी तरुण'



**कुँवरसिंह**

इंग्रजांनी भले बंड म्हणून हिणवले; तरी स्वातंत्र्याच्या, स्वराज्याच्या स्थापनेसाठी सर्वत्र पेटलेला हा अग्नी विझविता विझविता इंग्रजांच्या नाकी नऊ आले होते हे तर खरेच. कोण, कुठे आणि केव्हा बंडाचे निशाण उभारील याला सीमाच उरली नव्हती. प्रांताप्रांतात, गावागावात, घराघरात इंग्रजांविषयी पेटलेल्या असंतोषाच्या या ठिणग्या केव्हा केव्हा फार उग्र रूप धारण करीत. त्या ठिणग्यांचा अग्नी होऊ नये म्हणून त्यावर शक्तीच्या आणि युक्तीच्या प्रयत्नांची वाळू पसरताना इंग्रज अधिकारी थकून जात.

बिहार प्रांतात, पाटण्याच्या मुख्य ठाण्याचा कमिशनर टेलर याने नाना प्रयत्नांनी ही बंडातली माणसे नेस्तनाबूत करण्यासाठी अनेक युक्त्याप्रयुक्त्या योजल्या. त्याला काही प्रमाणात यशही लाभले. त्याच पद्धतीने जगदीशपूरच्या कुँवरसिंहाला फसवून त्याचा बंदोबस्त करण्याचा विचार टेलरने केला होता–

बिहार प्रांतात आरा नावाचे एक प्रमुख ठिकाण होते. त्या शहराच्या पश्चिमेच्या बाजूला १४-१५ मैलांवर जगदीशपूर ही कुँवर-सिंहाची जहागीर होती. तेथे एक मजबूत किल्ला असून त्यात कुँवरसिंहाचा भव्य वाडा होता. ज्यावेळी ही बंडाची धामधूम सुरू झाली त्या वेळी कुँवरसिंहाच्या तोडीचा युद्धनिपुण वीर साऱ्या बिहार-मध्ये एकही नव्हता. त्यामुळेच कुँवरसिंहाचा बिहारी लोकांवर फार मोठा वचक होता. साहजिक इंग्रजांचे आणि बंडवाल्यांचे लक्ष त्याच्या-वर केंद्रित झाले होते. कमिशनर टेलरने कुँवरसिंहाचा काटा काढण्याचा विचार केला तो याचसाठी आणि त्याच कारणासाठी बंडवाल्यांनी कुँवरसिंहाला नेतृत्व बहाल करण्याचे ठरविले. कुँवरसिंह त्या वेळी पराक्रमाच्या दृष्टीने सिंहासारखा होता आणि वयाने ऐंशी वर्षांचा कुमार होता. त्याने पाटण्याच्या आणि दानापूरच्या पलटणींतील हिंदी शिपायांशी सतत संबंध राखले होते; पण त्याचबरोबर इंग्रज अधिकाऱ्यांना वारंवार पत्रे लिहून आपली निष्ठा व्यक्त करण्याचा सपाटा चालविला होता. अशा धूर्त कुँवरसिंहाला कमिशनर टेलरने एक पत्र पाठविले –

“ – आपण आता वृद्ध झाला आहात. मला आपल्या प्रकृतीबद्दल अहर्निश चिंता वाटते. आपण माझा पाहुणचार घेण्यासाठी माझ्याकडे येऊन काही दिवस राहाल तर मला अतिशय आनंद होईल. आपण माझे निमंत्रण स्वीकाराल अशी आशा आहे. ” अशा अर्थाचे ते पत्र

होते. पत्र वाचून कुँवरसिंह वाक्यावाक्याला खदखदा हसला. त्याला यामागील धूर्त कावा सहज समजला. त्याने टेलरला असेच एक गोड पत्र लिहिले – " मी आपल्या अगत्यपूर्वक आमंत्रणाने भारावून गेलो आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे खरोखरच माझी प्रकृती बरी नाही. जरा बरे वाटले की मी आपल्याकडे अवश्य येईन. " पत्र लिहून होताच त्याने ते टेलरकडे रवाना केले.

इकडे दानापूरच्या शिपायांनी त्याच वेळी उठाव करून जगदीशपुरास कुँवरसिंहाकडे येऊन त्याला नेतृत्व बहाल केले. कुँवरसिंहानेही त्या सैन्याला मार्गदर्शन करण्याचे मान्य करून आरा शहरावर धाड घातली. आराचा तुरुंग, सरकारी खजिना, दफ्तरे यांची धूळधाण केली आणि आरा शहरामधील इंग्रजांची वस्ती असलेल्या एका कोठीला वेढा घातला. या कोठीत काही इंग्रज आणि त्यांचे इमानी शीख शिपाई होते. त्यांनी अनेक दिवस यशस्वीपणे प्रतिकार केला. आपल्या सुटकेसाठी कोणी तरी इंग्रज अधिकारी येईल अशी त्यांची अपेक्षा होती. त्याप्रमाणे कॅप्टन डनबारच्या नेतृत्वाखाली ४०० सैनिक दानापुराहून आऱ्याकडे निघाले.

अत्यंत विश्वासपूर्वक आणि निश्चयाने दानापूरहून निघालेली ही इंग्रजांची फौज संध्याकाळी शोन नदीतून बोटीने अलीकडे आली. बंडवाला केव्हा दिसतो आणि आपण त्याला केव्हा मारतो अशा ईर्ष्येने ते आराकडे निघाले; पण या वेळी कुँवरसिंहाने फार चतुर डाव टाकला होता. चंद्रप्रकाशात निश्चयाने पुढे सरकणारी इंग्रजांची फौज विशिष्ट टप्प्यापर्यंत बिनधोक आली. वाटेत कुठेच बंडवाल्यांकडून प्रतिकार झाला नाही; परंतु विशिष्ट ठिकाणी ती फौज येताच एकदम ' सुई-सुई ' करीत झाडावरून, झुडुपातून, दगडाआडून गोळ्या सुटल्या. बंडवाल्यांच्या या

अकस्मात झालेल्या हल्ल्यात प्रत्यक्ष डनबार पडला. इंग्रज सैनिकांची ससेहोलपट झाली. ते पळाले. नदीपार होण्यासाठी ते गडबडीने धावले. पुन्हा बंडवाल्यांच्या तावडीत सापडले. कत्तल झाली. काही नावा बुडवून, काहींना आगी लावून बंडवाल्यांनी त्यांची दाणादाण उडविली. ४०० पैकी केवळ ५० सैनिक कसेबसे परत गेले. बंडवाल्यांनी त्यांना चांगलाच हात दाखवला. इंग्रजांना पळता भुई थोडी झाली.

याच सुमारास मेजर आयर आपल्या तोफखान्यासह कलकत्त्याच्या वाटेवर दानापुरास आला. त्याला बंडवाल्यांचा सुगावा लागला आणि त्याने कोठीतल्या इंग्रजांच्या मुक्ततेसाठी आऱ्याकडे मोर्चा वळविला. त्याचा वेग जबरदस्त होता; पण कुँवरसिंहाला ही बातमी समजताच त्याने एका मोक्याच्या ठिकाणी आधी पोहोचण्याचा विचार करून, आपल्या सैन्याची जमवाजमव करून तो वृद्ध तरुण वेगाने तेथे गेला. इंग्रजांवर पुन्हा अचानक हल्ला करण्याचा त्याने बंदोबस्त केला. आयर आपल्या सैन्यासह तेथे येताच बंडवाल्यांनी त्याच्यावर चोरटा मारा करून त्याची प्रगती रोखली; पण या मिळणाऱ्या विजयाने बंडवाल्यांचा तोल सुटला. ते आयरच्या तोफांवर चालून गेले. इंग्रजांना शत्रू समोर दिसताच त्यांनी जोर केला. नेहमीची गनिमी काव्याची लढाई सोडून उघड्यावर सामना देण्यात बंडवाल्यांनी फार मोठी चूक केली. इंग्रजांनी संगिनीची लढाई करून बंडखोरांना पळवून लावले, व त्यांचा पराभव केला. आयर विजयी झाला. कुँवरसिंह तेथून पळाला आणि जगदीश-पुरास गेला.

मेजर आयरने आरा शहरात येऊन कोठीतल्या इंग्रजांची मुक्तता केली. शहराचा बंदोबस्त केला. तेथे शांतता प्रस्थापित होताच तो जगदीशपुरावर चालून गेला. कुँवरसिंह या हल्ल्याची अपेक्षा करीतच

होता. त्याने छोट्या-छोट्या टोळ्या करून वाटेत आयरला रोखण्याचा प्रयत्न केला; पण त्यात त्याला यश आले नाही. आयर जगदीशपुराकडे सरकत राहिला. कुँवरसिंहाला गाव सोडणे भागच होते. तो येथून पळून ससरामच्या डोंगराळ प्रदेशात निघून गेला. आयरला त्या वृद्धाच्या या गतिमान हालचालींचे आश्चर्य वाटले.

ससरामच्या डोंगरात कुँवरसिंह इंग्रज सैन्याला हुलकावण्या देत राहिला. अखेरीस इंग्रजांनी कुँवरसिंहास पकडून देणाराला मोठे इनाम जाहीर केले; पण या वेळी उलटाच प्रकार झाला. त्या वृद्ध नेत्यावर बिहारी जनतेची आणि बंडवाल्या शिपायांची एवढी प्रीती, एवढी भक्ती जडली होती की त्याला पकडून देण्याऐवजी ते त्याला साहाय्य करू लागले. इंग्रज सैन्याच्या बातम्या पुरवणे, त्याला लपण्यासाठी जागा देणे, पैसा, शस्त्रे व माणसे पुरविणे अशा अनेक मार्गांनी त्यांनी त्याला मदत केली.

कुँवरसिंह हे इंग्रज-फौजांचे एक मोठेच दुखणे होऊन बसले होते. ठिकठिकाणी फौज उभी करीत या वृद्धाने चपळाईने हालचाली सुरू ठेवल्या. अनेक मैलांची रपेट तो सहज करीत होता. त्यामुळे त्याचा पाठलागही अशक्य होऊन बसला होता. दिल्लीपर्यंत जाऊन भिडण्याचा कुँवरसिंहाचा विचार होता; पण दुर्दैवाने इंग्रजांनी दिल्लीस पुन्हा सत्ता प्रस्थापित केल्याची बातमी त्याला लागली. तेव्हा तो तसाच अयोध्येकडे वळला. अनेक लोक सारखे त्याच्या फौजेत दाखल होत होते. आजमगडावर त्याने हल्ला करून तो घेतला; पण पुन्हा मिलमनच्या मदतीला मार्ककार येऊन त्यांनी कुँवरसिंहाला पिटाळून लावले. आता बाहेर उघड्यावर आलेल्या कुँवरसिंहावर जनरल लुगार्ड चालून गेला. त्या वेळी कुँवरसिंह मोठ्या पेचात सापडला. लुधाई गावी त्याची

कॅप्टन डगलसशी गाठ पडली. इंग्रजांच्या सेनेची तयारी भारी होती हे पाहून त्याने आपल्या एका टोळीला त्या सैन्यास अडविण्याचे काम सांगितले व तो स्वतः घोग्रा नदीपार झाला; पण डगलसने त्याचा पीछा केला.

कॅप्टन डगलस युद्धनीतीत अत्यंत तरबेज होता. आता कुँवरसिंहाचा गंगापार होण्याचा प्रयत्न असणार हे ओळखून त्याने तेथील सर्व नावा एका ठिकाणी आणून बुडवून ठेवल्या. यानंतर कुँवरसिंहाला जणू आपण नदीकडे चेपत आहोत ते गैरसमजाने असे दाखवून डगलसने कुँवर-सिंहाला नदीकडे जाऊ दिला. कुँवरसिंह या वेळी फसला. नदीपार होण्यासाठी तो वेगाने नदीकाठी गेला; पण तेथे गेल्यावर एकही नाव मिळण्यासारखी नाही असे पाहून तो निराश झाला. आता आपण इंग्रजांच्या कोंडीत सापडलो. प्रतिकार करीत फळी फोडण्याखेरीज अन्य मार्ग नाही म्हणून तो त्या तयारीला लागला. तेवढ्यात नदीकाठच्या गावा-तील लोकांनी त्याला नावा बुडवून ठेवलेली जागा दाखविली. एवढेच नव्हे तर त्यांनी कुँवरसिंहासकट त्याचे सर्व सैन्य नदीपार पोहोचविले.

कॅप्टन डगलसला कुँवरसिंह नदीपलीकडे गेल्याचे समजताच तो अक्षरशः मनगटे चावून राग व्यक्त करीत राहिला; पण तेवढ्यात त्याला नदीपलीकडे कुँवरसिंह मोठा विजयोत्सव करीत आहे आणि बंडखोर सैनिक, कुँवरसिंहाची मिरवणूक काढण्याच्या विचारात आहेत असे आढळून आले. लागलीच त्याने आपल्या लांब पल्ल्याच्या तोफा नदी-काठावर आणविल्या. मिरवणुकीत हत्तीवर स्वार झालेल्या कुँवरसिंहाचा वेध घेत तोफेचे गोळे सुटले—एक गोळा कुँवरसिंहाच्या हाताला लागला. बंडखोर या अचानक हल्ल्यामुळे गोंधळात पडल्यासारखे होऊन चारी दिशांना पळत सुटले.

कुँवरसिंहाच्या लोकांनी त्याला उचलून पळविले. तेव्हा या जखमी सिंहाने आपला जायबंदी हात तोडण्याची आज्ञा केली. मोठ्या कष्टाने एका सैनिकाने त्याचा हुकूम मानला. पुढे ते त्याला जगदीशपूरला घेऊन गेले.

पण आता जगदीशपूरला उरले होते कुँवरसिंहाच्या अलिशान वाड्याचे भग्न अवशेष ! तेथे एका झोपडीत त्याला ठेवून त्याची शुश्रूषा करण्यात त्यांनी दिवसरात्र कष्ट केले; परंतु जखमेतून झालेला रक्तस्राव आणि त्यातच आलेला भयंकर ज्वर यांनी जर्जर झालेला तो वृद्ध युवा फार दिवस जगणे अशक्य झाले. आता तो अखेरचे दिवस मोजीत होता. ही बातमी सर्वत्र पसरली. कुँवरसिंहाचे अनेक चाहते दूरदूरच्या ठिकाणांहून त्याला पाहण्यासाठी आले. समाचारासाठी एकत्र आलेल्या त्या सर्वांची इंग्रजांना एवढी दहशत बसली की त्या जमावाची पांगापांग करण्यासाठी त्यांनी फौज पाठविली; पण आश्चर्य असे की, मरणोन्मुख कुँवरसिंहाच्या आत्म्याला शांती देण्यासाठीच जणू काही विजयश्रीने कुँवरसिंहाच्या सैनिकांनाच या वेळी यशमाला घातली. अत्यंत समाधानाने कुँवरसिंहाने प्राण सोडला.

◆ ◆

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ..११८.६९ नों. दि. ..........
वि. ....बा.वा.. क्रं. ..........

IRBK-0111769

IRBK-0111769